ऑनलाइन आवृत्ती

# ईशान्य वार्ता

Ishanya Varta Rs. 30/-
वर्ष ८, अंक ४, जुलै २०२०, मूल्य रु. ३०/-



## नागा प्रदेशातील करोना वीर



# श्री. मधुर पडवळ : ईशान्येतील लोकसंगितामध्ये रमणारा एक अवलिया युवक

**- कुणाल सुतावणे, ९८१९५०४०२०**

एक नाही दोन नाही, तर तब्बल ५०-५५ वाद्य वाजविणारा एक अवलिया. अजून माझी आणि



त्याची भेट नाही झाली, पण इंटरनेटच्या महाजालामध्ये तो मला भेटत गेला. कधी त्या live session मध्ये तर कधी Youtube च्या अनेक व्हीडीओमधून तो मला दिसत राहिला. आणि नंतर मग त्याच्या माझ्या भ्रमणध्वनीवर गप्पा सुरु झाल्या. दोघांचा विषय एकच असल्यामुळे (अर्थात ईशान्य भारत) गप्पांमधून मला त्याचा प्रवास उलगडत गेला.

नाव - मधुर पडवळ, ध्यास - आदिवासी लोकसंगीत आत्मसात करायचे. नवीन संगीत शिकायचे आणि ते नामशेष होऊ नये म्हणून जतन करुन ठेवायचे. स्वत:चे Folk - Wagon नावाचे Youtube channel. गेल्या ६-७ वर्षांपासून मधुर ईशान्य भारतामध्ये भ्रमंती करत



आहे.तिथले लोकसंगीत शिकायचे आणि त्यांचे ते वाद्य घेऊन यायचे. आदिवासी लोकसंगीत शिकायचे हा एकच ध्यास घेऊन तो परत-परत त्या भागात फिरत राहिला. आज हा तरुण ईशान्य भारतातली १६ वाद्ये वाजवू शकतो. तो सांगत होता की, एका वाद्याची माहिती जाणून घ्यायची असेल तर तिथे त्या भागात १५-२० दिवस राहावे लागते. तेथील लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो. परत भाषेची आडचण तर असतेच. आपली स्वत:ची ओळख पटवून दिल्याशिवाय पुढे काहीच हालचाल घडत नाही. ईशान्य भारतातील अनेक महोत्सवांना त्याने भेटी दिल्या आहेत.



आसाममधील ९ वाद्यांचा त्याने आतापर्यंत आभ्यास केला आहे. तो पेपा (म्हशीच्या शिंगापासून बनविलेले वाद्य), गोगोना (बिहू संस्कृतीचे एक महत्त्वाचे वाद्य), झुतुलि (रंगोली बिहू महोत्सवमध्ये वापरले जाते)....

**पुढील मजकूर पान नं. २७**

**ईशान्य वार्ता**
**वेध ईशान्येचा - वेध परिवर्तनाचा** RNI Reg. No. MAHMAR/2012/45108

**Email - friendsofne@gmail.com**

**वर्गणी दर - वार्षिक रु. ३००/-**
**द्वैवार्षिक रु. ५००/-**
**त्रैवार्षिक रु. ८००/-**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ● मधुर पडवळ : ईशान्येतील लोकसंगितामध्ये रमणारा एक अवलिया युवक | कुणाल सुतावणे | ०२ |
| ● नागा प्रदेशातील कोरोना योद्धा : श्री. नायवांग कोन्याक | मनोगत | ०९ |
| ● सांप्रत | चंद्रकांत जोशी | ११ |
| ● ज्योती पासवान | नरेंद्र प्रभू | १४ |
| ● आसाममधील बोटीतले दवाखाने | सुभाष जोशी, डोंबिवली | १८ |
| ● अरुणाचल प्रदेशातील दापोरिजो पुल | प्रतिनिधी | २० |
| ● सेवा भारती मेघालय : मदतकार्य | राजेश राव, शिलाँग | २३ |
| ● नागा प्रदेशातील एका 'मास्तरची गोष्ट' | संजय काठे | २५ |
| ● पुस्तक | डॉ. स्वाती गाडगीळ | २८ |


**श्री. कुणाल सुतावणे** यांची कार्यालय व्यवस्थापक म्हणून जानेवारी २०२० पासून नियुक्ती झाली आहे. संपादकीय विषयांशी संबंधीत कामे वगळता इतर सर्व कामांसाठी श्री. कुणाल सुतावणे यांच्याशीच संपर्क साधावा. कार्यालयाची वेळ सकाळी १०.३० ते ०१.०० व संध्याकाळी ०५.०० ते ०७.०० अशी असेल.

**संपादक**
पुरूषोत्तम रानडे
९९६९०३८७५९
९९६९१४९७७१

**पत्रव्यवहार - संपादकीय**
१३, कृष्ण कुटीर, आयरे रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. जि. ठाणे.

**प्रकाशक**
जयवंत कोंडविलकर
९६१९७२०२१२
९ जयगायत्री, गोपाळनगर, रस्ता क्रं १,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.

**समन्वयक**
संजय काठे : ९९६९००९२५५

**कार्यालय व्यवस्थापक :**
**पत्रव्यवहार** - कुणाल सुतावणे,
मो.९८१९५०४०२०
ईशान्य वार्ता, द्वारा विविसु डेहरा, २
हरीकुंज अपार्टमेंट, गणेशमंदिर मार्ग,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.

**मुखपृष्ठ** - रवि थेटे : ९८५०९३८०८१

**वर्गणीचा धनादेश या नावे काढावा : Friends of Northeast Society, Dombivli**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही. त्याचप्रमाणे या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक वा प्रकाशक हे ही सहमत असतीलच असे नाही.

संवाद

# संग्राह्य प्रेरणादायी महिला विशेषांक

मार्च २०२० महिला विशेषांक पूर्ण वाचूनच खाली ठेवला. केवळ अप्रतिम! छापील ४२ पानातलं प्रत्येक पान अमूल्य माहितीने भरलेलं आहे. तुम्ही परिचय करुन दिलेली एक-एक व्यक्ती म्हणजे मौल्यवान मानवी रत्नेच आहेत. त्यांच्या विषयीच्या आदरानं आणि अभिमानानं मन भरुन आलं. तुम्ही करत असलेल्या या कार्याची वृद्धी होणारच यात काही शंका नाही. ज्यांचं मन आणि बुद्धी ताळ्यावर आहे अशा अनेकानेक तरुणांना हा अंक वाचून स्फूर्ती प्राप्त होईल. ते अनेक प्रकारांनी या कार्याशी स्वत:ला जोडून घेतील असं या अंकातलं लेखन झालं आहे. म्हणजेच मुळात या साऱ्या व्यक्तींचा ध्येयवाद, प्रयत्न, चिकाटी, धैर्य हीच वाखाणण्यासारखी आहेत. तुम्ही हा विशेषांक काढून या व्यक्तीमत्वांचा परिचय अनेकांना करुन दिलात त्यासाठी मानावे तितके आभार थोडे आहेत.

हा अंक नेहमी इतकाच काढला नाहीत ना? हा मोठ्या संख्येत छापून विक्रीला ठेवा. जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. सध्याच्या काळात देशसेवेची भावना, सत्कर्माची ओढ हे संजीवन आहे. ईशान्य भारताचा घास घ्यायला टपून बसलेल्या शत्रूच्या घशातून तो ओढून काढणं हे किती मोठं आणि आवश्यक काम आहे हे सेनेप्रमाणेच जागरुक जनता जाणू शकते. या महिला कार्यकर्त्यांची ओळख समाजाला करुन देऊन तुम्ही अभिनंदनीय काम केलं आहे. सर्व कार्यकर्त्यांचे धन्यवाद आणि आभार.

**- अनुराधा खोत, पुणे**
**९५५२५१८५५२**

---

# महिला कार्यकर्त्यांना दाद आणि प्रोत्साहन द्यायला हवे

ईशान्य वार्ता मासिकाचा मार्च महिन्याचा महिला विशेषांक प्राप्त झाला; आणि त्वरीत तो वाचला. कारण एकच की, प्रत्येक महिन्याची चार-पाच तारीख जवळ आली की 'अंक कसा नाही आला अजून ?' अशी चुटपूट लागते. ही उत्सूकताच आपल्या अंकाचे वाङमयीन मूल्य ठरवते असे मला वाटते. आपले अनेक स्थानी सत्कार होत आहेत, अगदी गावपातळीवरही, ही वस्तुस्थिती मासिकाचा अधिकाधिक प्रसार व्हावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या आमच्या सारख्या कार्यकर्त्यांचा अभिमान वृद्धींगत करणारी आहे.

महिला विशेषांकामुळे ईशान्येकडील राज्यातील घटना तर कळतातच, शिवाय तेथील महिला समाज बांधणीसाठी स्थानिक अडचणींवर मात करुन कार्यरत आहेत हे ही समजलं. त्याचप्रमाणे पुरुष कार्यकर्त्यांच्या प्रमाणेच अनेक महाराष्ट्रीय महिला ही तिथे कार्यरत आहेत हे ही समजले. एकूणच तेथील स्थानिक काय किंवा महाराष्ट्रातून तेथे गेलेल्या काय, स्त्रियांकडे अबला म्हणून पहाण्याचा दृष्टीकोन आता

खूप बदललेला दिसतो. त्यामुळेच या महिला बेडरपणे समाजोत्थानासाठी कार्यरत आहेत. त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन द्यायला हवे.

याच संदर्भात असे सुचवावेसे वाटते की, गेली अनेक वर्षे महाराष्ट्रातील वसतीगृहे व पुर्वांचलामध्ये योग्य तो समन्वय अत्यंत कष्टपूर्वक साधण्याचे काम करणाऱ्या श्री. संजय काठे यांनाही योग्य ती दाद द्यायला हवी. म्हणून मला वाटते की, श्रीमान संजय काठे आणि त्यांचे कार्य ह्यांचा विस्तृत परिचय लवकरात लवकर एखाद्या अंकात प्रसिद्ध करावा. अंकातील डॉ. अपर्णा उत्पात ह्यांचा 'आपल्याला नेमके काय हवे आहे?' हा लेख अत्यंत मार्मिक असून महिलांनी करिअर करतांना आत्मचिंतन करुन 'थांबावे कुठे' ह्या संबंधी आत्मभान देणारा आहे.

**- अशोक सि. जोशी, पुणे - ९३७१००५३११**

## महिला कार्यकर्त्यांना माझा मानाचा मुजरा

**- गंगाराम गवाणकर, अ. भा. मराठी नाट्य संमेलन, माजी अध्यक्ष - ९९६९१६८९९४**

मार्च महिन्याचा ईशान्य वार्ता महिला विशेषांक अगत्यपूर्वक पाठविल्याबद्दल आभार! जिद्द, चिकाटी, मातृत्व आणि दातृत्व ही चार ब्रह्मास्त्रे निसर्गाने महिलांना जन्मतःच बहाल केलेली आहेत. त्या आधारे विश्वातील कुठली ही अवघड आणि किचकट गोष्ट त्या सोपी करुन दाखवितात. आपल्या अंकातून परिचय करुन दिलेल्या सर्वच महिला "बाप" आहेत. त्यांना माझा मानाचा मुजरा.

साहित्यातील साचलेपणा घालवायचा असेल तर ग्रामीण भागात लिहित्या हातांची संख्या वाढणं काळाची गरज आहे. सामाजिक कार्यकर्त्या आणि फर्ड्या वक्त्या मुक्ता दाभोळकरांच्या या सुभाषितवजा वाक्याची दखल शासन आणि विद्यापिठांनी घ्यावयास हवी. पण ते जरा कठीणच दिसतंय. त्यासाठी एखाद्या बहिणाबाईंना पुन्हा जन्म घ्यावा लागेल.

'संपादक' या नात्याने 'सांप्रत' च्या माध्यमातून चिकननेकच्या धोक्याच्या घंटेचे पडसाद आपण उमटविलेले आहेत. धन्यवाद! एखाद्याच्या हक्काच्या भूमीवर जेंव्हा कुणी अहंपणे किंवा सूडबुद्धीने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्याच्यावर निसर्गच उलटतो. तुम्ही चिकननेकचा लेख लिहित असतानाच चीनच्या 'नेक' भोवती करोनाने फास आवळायला सुरुवात केली होती.

नाटे गावात भरलेल्या ६ व्या ग्रामीण साहित्य संमेलनाचा वृत्तांत श्री. राजेंद्र बांदिवडेकरांनी अगदी महाभारतातल्या 'संजयाच्या' द्रष्टेपणाने घेतलेला आहे. त्यांचे अभिनंदन! तुम्ही आपल्या राजापूर तालुक्यातील आडीवरे गावाचे आहात ह्या गोष्टीचा **'माका सार्थ अभिमान वाटता'**!

**Conrad K. Sangma, Chief Minister, Meghalaya**

Dated : Shillong 23rd April 2020

**Rashtriya Swayamsevak Sangh, Sachindra Bhavan, Shillong**

I take this opportunity to extend my deepest Appreciation and Gratitude to your Organisation for Voluntarily donating essential commodities to the affected citizens in the Relief Camps and localities in Meghalaya in view of the lockdown due to the Coronavirus Pandemic.

Such act of kindness and generosity in the times of Adversity bring hope and restore the faith of humanity. Because of your generosity, the Government of Meghalaya was able to further its help and support to the affected citizens. We look forward for your continuing support and appreciation in the future as well.

Thanking you,
With warm regards.
**- Conrad K. Sangma**

# Sushant Rajput : Friend of Nagaland

As former Governor of Nagland, I am pained to know that Actor Sushant Rajput is no more. I salute him on behalf of all Nagas.



Three years back when there was Natural Calamity, on our appeal for help Sushant silently reached Dimapur and contributed **Rs. One Crore** to relief. He spoke to me and said, ‘Sir, I wanted to meet. But it was 4 hours Road journey to Kohima and he wanted to go back by next flight.

Nobody responded like this. I was overwhelmed with his **Spirit of Patriotism.** We Nagas Salute him & pray Almighty that his soul rest in peace.

**- Shri Padmanabh Acharya**
**Former Governor of Nagaland**

ईशान्य वार्ता
वेध ईशान्येचा - वेध परिवर्तनाचा

*संपादकीय......*

# एकात्म भारताचे दर्शन

♦●♦●♦

**आजवर 'अँटी ख्रिश्चन' अशी संघाची प्रतिमा निर्माण करण्यासाठी ज्यांनी खोट्या-नाट्या घटनांचा आधार घेऊन अपप्रचाराची मोहिम उघडली होती, त्यांचे सर्व मनसुबे या मदतकार्यामुळे धुळीस मिळाले आहेत. मेघालयासारख्या कडव्या ख्रिस्ती राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, श्री. कोनराड संगमा यांनी, सेवा भारतीला पाठवलेल्या आभार पत्रामुळे तर अशा अपप्रचार करणाऱ्यांचे पितळच उघडे पडले आहे. अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक उपासनापद्धती, अनेक पंथ असूनही 'हे माझे राष्ट्र आहे' असा भाव लक्षावधी नागरिकांमध्ये निर्माण करण्यात संघ यशस्वी ठरला हेच या अभूतपूर्व व्यापक मदतकार्यामागचे इंगित आहे.**

♦●♦●♦

'प्रत्येक काळ्या ढगाला रुपेरी किनार असते' असे म्हणतात. कोरोना साथीच्या जागतिक संकटात त्याची प्रचिती आपल्या देशाने घेतली आहे. टाळेबंदीमुळे ज्या हातावर पोट असलेल्या कामगारांचे जगणे कठीण झाले, लाखोंच्या संख्येत परप्रांतात जे मजूर आणि विद्यार्थी अडकले, ज्यांच्या दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला, त्यांना सहाय्य करण्यासाठी मदतीचे लक्षावधी हात पुढे सरसावले ही घटना साधीसुधी नाही.

इतकंच काय, पण जेंव्हा लाखोंच्या संख्येतील स्थलांतरीत मजूरांचे तांडे, अनवाणी, अन्न-पाण्याशिवाय चालू लागले; तेंव्हा त्यांनाही दोन घास मिळावेत म्हणून मदतीचे हात पुढे झाले. रेल्वेप्रवासात त्यांना काही तरी खायला मिळावे याचीही सोय केली गेली. व्यक्तीगत पातळीवर तसेच सामाजिक संस्थांचे आणि स्वयंम्सेवी संस्थांचे लाखो कार्यकर्ते किमान दीड-दोन महिने प्रत्यक्ष सेवा कार्यात गुंतले होते. धनवंतांनीही आर्थिक मदतीच्या स्वरुपात या सेवा कार्यात भाग घेतला. त्यामुळे अन्न-पाण्याचे सर्व प्रश्न सुटले नाहीत, तरी त्यांची तीव्रता नक्कीच कमी झाली. अन्यथा उपासमारीने भूकबळीच पडते!

सरकारी पातळीवरील प्रयत्नांना, ही सामाजिक पातळीवरील मदत मोठ्या प्रमाणात पूरक ठरली. या सेवा कार्यात रा. स्व. संघ प्रणित अनेक संस्थांचे कार्यकर्ते आघाडीवर होते. अशा कार्यकर्त्यांची खात्रीशीरपणे प्राप्त झालेली एकूण संख्या ३ लाखांपेक्षा अधिक आहे. संघाची राष्ट्रीय पातळीवरील संपर्क व्यवस्था त्वरित सक्रीय झाली, म्हणूनच व्यापक स्वरुपातील मदतकार्य वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहोचू शकले. विशेष म्हणजे धर्म, जात, भाषा, प्रांत असा कोणत्याही प्रकारचा

भेदभाव या सेवाकार्यात चुकूनही दिसून आला नाही. अर्थात संघद्वेष हाच ज्यांच्या समाजकारणाचा आणि राजकारणाचा पाया आहे, ते महाभाग चुकूनही या बाबीचा उल्लेख करते झाले नाहीत आणि यापुढे ही करणार नाहीत.

ईशान्य भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी देशभर झालेले प्रयत्न हे या मदतकार्याचे ठळक वैशिष्ट्य ठरले आहे. लॉकडाऊन नंतरच्या सुरुवातीच्या काही दिवसात चेहरेपट्टीच्या साधर्म्यामुळे आणि चीनमधून कोरोना साथीचा फैलाव झाल्याच्या बातम्यांमुळे ईशानी बांधवांच्या बाबतीत वांशिक भेदभावाचे काही तुरळक प्रकार काही राज्यात घडले, नाहीत असे नाही. पण कोरोना साथीची भीती आणि ईशान्य भारताविषयीचे अज्ञान हे या मागचे एक प्रमुख कारण होते.

मात्र अशा घटना घडत आहेत हे लक्षात येताच, प्रामुख्याने ज्या शहरात ईशानी नागरिक मोठ्या संख्येत आहेत, तिथे संघप्रणित संस्थांनी मदतीसाठी हेल्पलाईन मोबाईल क्रमांक जाहीर केले. त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. ईशानी नागरिकांच्या भोजनाची आणि अडचणीत सापडलेल्यांच्या निवाऱ्याचीही सोय करण्यात आली. समाजाचेही उत्स्फूर्त सहकार्य या कामी मिळाल्याचा अनुभव सर्वांना आला.

केंद्र सरकारच्या पातळीवरही या राज्यांना मोठ्या प्रमाणात मदत केली गेली. कोरोना प्रतिबंधांसाठी औषधांचा पुरवठा तातडीने व्हावा, म्हणून लष्कराच्या मालवाहतूक करणाऱ्या विमानांची सोय करण्यात आली. ईशान्येतील सर्व राज्ये एकमेकांच्या सहकार्यासाठी पुढे आली. ज्यांना फक्त ६ वर्षांपूर्वी ईशान्येतील काही राज्यांत किती द्वेषाची आणि वैराची भावना होती याची माहिती असेल, त्यांनाच या बदललेल्या वातावरणाची कल्पना येईल. याचे श्रेय एन.डी.अे. सरकारच्या ईशान्य विषयक सातत्यपूर्ण धोरणाला द्यावे लागेल.

ईशान्येतील सर्व राज्यात सेवा भारती, जनजाती विकास समिती, कल्याण आश्रम, अरुणाचल विकास परिषद, विद्यार्थी परिषद यांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मदत कार्यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. इतकंच काय, देशातील विविध राज्यात शिक्षण घेऊन आपल्या गावी परत गेलेल्या माजी विद्यार्थ्यांनी स्वयमृस्फूर्तीने मदत कार्यात अनेक ठिकाणी नेतृत्वही केले. विशेष म्हणजे त्यात संघसंपर्कातील ईशान्येतील महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

आजवर 'अँटी ख्रिश्चन' अशी संघाची प्रतिमा निर्माण करण्यासाठी ज्यांनी खोट्या-नाट्या घटनांचा आधार घेऊन अपप्रचाराची मोहिम उघडली होती, त्यांचे सर्व मनसुबे या मदतकार्यामुळे धुळीस मिळाले आहेत. मेघालयासारख्या कडव्या ख्रिस्ती राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, श्री. कोनराड संगमा यांनी सेवा भारतीला पाठवलेल्या आभार पत्रामुळे तर अशा अपप्रचार करणाऱ्यांचे पितळच उघडे पडले आहे. अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक उपासनापद्धती, अनेक पंथ असूनही **'हे माझे राष्ट्र आहे'** असा भाव लक्षावधी नागरिकांमध्ये निर्माण करण्यात संघ यशस्वी ठरला हेच या अभूतपूर्व व्यापक मदतकार्यामागचे इंगित आहे. ●●

## वाचकांच्या माहितीसाठी

लॉकडाऊन व टपालखात्याची वितरण व्यवस्था बंद असल्याने एप्रिल, मे व जून २०२० महिन्याचे अंक प्रकाशित होऊ शकले नाहीत. परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत जुलै महिन्यापासूनचे पुढील काही अंक डिजिटल स्वरुपात प्रकाशित होतील.

- **संपादक**

# नागा प्रदेशातील कोरोना योद्धा : श्री. नायवांग कोन्याक

**(मनोगत - श्री. नायवांग कोन्याक ०७०८५४७७२९९)**

**"तुम्ही तुमचे कर्तव्य पार पाडीत गरजवंताला मदत करा,**

**तुमचा भविष्याकाळ उज्जवलच असेल"**

माझे नांव नायवांग कोन्याक. नागालँडमधल्या मोन जिल्ह्यातल्या शियाँग या खेड्यात मी राहतो. "वनवासी कल्याण आश्रम" या संस्थेच्या वसतीगृहात राहून रत्नागिरी येथील पटवर्धन इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मी माझे शिक्षण पूर्ण केले. शियाँग खेड्यातल्या शाळेत मी सध्या हिंदी भाषेचा शिक्षक म्हणून कार्यरत आहे.




कोविद-१९ च्या प्रभावामुळे नागालँडमध्ये सर्वत्र कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. प्रत्येक खेड्यात नवीन नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्यात येत आहे. स्वत:च्या गावातील लोकांचे कोरोना पासून रक्षण करण्यासाठी सरकारी नोकर, रक्षक, ग्रामपंचायत व नगर परिषद आणि विद्यार्थ्यांच्या संघटना हे सगळे जण कठोर परीश्रम घेत आहेत.

सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आमच्या शियाँग शाळेतील विद्यार्थ्यांच्या संघटनेतील सदस्य खेड्यातील प्रवेशद्वारा जवळ खडा पहारा देत आहेत. संध्याकाळी ६ वाजेनंतर प्रवेशद्वार बंद करण्यात येते. बाहेरुन आमच्या खेड्यात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीने गावात येण्याचे योग्य कारण तसेच त्याची ओळख सिद्ध केल्याशिवाय त्या व्यक्तीला गावात प्रवेश दिला जात नाही. प्रवेश देण्यापूर्वी त्या व्यक्तीचे सगळे तपशील नोंदविले जातात. व्यक्तीचे नांव, गावात येण्याचे प्रयोजन व हेतू, व्यक्ती कोणत्या गांवातून आली, त्याचा तपशील आणि आगमन व निर्गमनाचा वेळ हे सगळे नोंदविण्यात येते. आमच्या सरपंचांनी आम्हाला मदतीसाठी ग्रामपंचायतीचा एक सदस्य व दोन सुरक्षा रक्षक दिले आहेत. तसेच खेड्यात फिरुन आम्ही लोकांना मास्क वापरणे, स्वच्छता पाळणे, सॅनिटायझर वापरणे आणि एकमेकांत योग्य अंतर ठेवून वावरणे या बद्दल सुचना देत असतो.



## “मानव सेवा हीच ईश्वर सेवा”

आमच्या खेड्यातील लोक हे रोजंदारीवर काम करणारे आहेत व त्यांतले पन्नास टक्के कामगार आहेत. लॉकडाऊनमुळे त्यांचे उपजिवीकेचे साधन उपलब्ध नाही व त्यामुळे त्यांचे जेवणाचे हाल होत आहेत. आमच्या तसेच आजु-बाजुच्या अशा अती गरीब लोकांना अन्न-धान्य व अन्नपदार्थ वितरण करण्याची योजना मी आखली आहे. मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक आहे. माझ्यावर झालेल्या संस्कारांमुळे गरीबांची सेवा करणे हे माझे कर्तव्य आहे असे मी मानतो.




त्यासाठी प्रथम मी नागालँडमधील दिमापूर येथील “सेवा भारती” या संस्थेशी संपर्क साधला व त्यांना मदत करण्याची विनंती केली. दिमापूर विभागातले प्रचारक श्री. आलोकजी यांच्याकडे याबाबत मी प्रथम विचारणा केली. त्यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे नंतर मी “सेवा भारती, नागालँड” चे अध्यक्ष डॉ. शंकरजी यांच्याशी संपर्क साधला. डॉ. शंकरजी यांनी मदत करुन पाठींबा दिल्याने २६ एप्रिल २०२० रोजी माझ्या गांवातील ३६ गरीब कुटुंबांना प्रत्येकी ८ किलो तांदुळ वाटण्यात आला.

त्यानंतर, रत्नागिरीच्या पटवर्धन इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माझ्या त्या वेळच्या वर्ग मित्रांनी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे ३ मे २०२० रोजी १०७ गरजू कुटुंबांना मी प्रत्येकी २ किलो मसुरडाळ वितरीत केली. पुन्हा १७ मे २०२० रोजी १ किलो मसुरडाळ व सोबत मिठाचा १ पुडा अतीशय गरीब अशा ७० कुटुंबांना वाटण्यात आले.



मुंबईच्या **“सेवा सहयोग फाउंडेशन”** या संस्थेचे **दिलीप परांजपे** आणि **संजय हेगडे** यांनी ही आमुच्या कोविद-१९ कार्यात मोलाची मदत केली. मी या संस्थेचे आभार मानतो. दूरवरच्या महाराष्ट्रातील, मुंबई येथील एका सेवाभावी संस्थेने अशी गोरगरीबांना मदत दिली त्याबद्दल आमच्या खेड्यातल्या लोकांनी आश्चर्य व्यक्त करुन प्रायोजक संस्थेचे आभार मानले.●●

संप्रत

# चीन विरोधात भारताची आक्रमक रणनीती

चंद्रकांत जोशी
९८६९०१३५८९

♦●♦●♦

**मात्र मिडियातील घरभेदी आणि बुद्धीभेदी हस्तकांच्या करवी भारतीयांचा आत्मविश्वास डळमळीत व्हावा म्हणून चीनने सायकॉलॉजिकल वॉर व प्रपोगंडा वॉर सुरु केला आहे. त्याला बळी न पडता देशाचे नेतृत्त्व करणाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि अक्साई चीन ताब्यात घेण्याचा जाहीर मनोदय आपल्या गृहमंत्र्यांनी या पुर्वीच व्यक्त केला आहे. भारताच्या या आक्रमक रणनितीचा परिणाम म्हणून जागतीक पातळीवर एकटा पडलेला चीन, लडाख सीमेवर वातावरण तापवण्याचा प्रयत्न करीत आहे.**

♦●♦●♦

चीनच्या आजवरच्या अरेरावीला तोडीसतोड उत्तर देणारी आक्रमक रणनीती भारताने आखली आहे. चिनी सैनिकांनी करार मोडीत काढून आणि सर्व संकेत धाब्यावर बसवून एखाद्या गल्लीतल्या गुंड टोळक्याने समोरच्याला मारहाण करावी अशाप्रकारे भारतीय सैनिकांवर गालवान खोऱ्यात हल्ला केला. प्राणांचे बलिदान देऊन आणि चीनी सैनिकांनाही मार देऊन भारतीय सैनिकांनी चीनची घुसखोरी रोखून धरली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शांतपणे परंतु कणखर भूमिका घेऊन चीन बरोबरच्या ३५०० कि. मी. च्या सीमारेषेवर ताबडतोब लष्करी तुकड्या तैनात केल्या. संरक्षणदलांना सर्वाधिकार दिले.वायुदलाने हवाई पट्ट्यांवरून कोणत्याही क्षणी विमाने उड्डाण करु शकतील अशी सज्जता ठेवली; आणि परिस्थिती नियंत्रणात आणल्यावर मगच सर्वपक्षीय नेत्यांची पत्रकार परिषद घेतली.

या पत्रकार परिषदेत काँग्रेस आणि कम्युनिस्टांची देशविरोधी मानसिकता दिसून आली. पंतप्रधानांवर प्रश्नांची सरबत्ती केली ती सोनिया गांधींनी. ज्यांचा केंद्र सरकारच्या निर्णय क्षमतेवर आणि लष्करावर विश्वास नाही अशीच व्यक्ती असे प्रश्न विचारु शकते. प्रश्न विचारले म्हणून टीका नाही, पण पंतप्रधानांशी संपर्क साधून गालवान खोऱ्यातील वस्तुस्थिती अगोदर त्यांनी समजावून घेतली असती तर ते अधिक योग्य ठरलं असतं. **खरंतर १९९३ चा करार मोडीत काढून आणि लष्करी संकेतांच उल्लंघन करुन भारतीय सैनिकांवर हल्ला केल्याबाबत चीनचा निषेध सर्व विरोधी पक्षांनी विशेषतः काँग्रेसने करायला हवा होता. मिडियाचा वापर करुन चीनविरोधात प्रचाराची आघाडी उघडायला हवी होती. त्या ऐवजी पंतप्रधानांवरच प्रश्नांची सरबत्ती केली गेली.**

परंतु अशा बाबींकडे फारसे लक्ष न देता तीन्ही सेनादलांना आकस्मिक परिस्थितीत योग्य ते निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देऊन पंतप्रधानांनी सेनादलांवर विश्वास दाखवला आणि त्यांनी तो सार्थ केला. कृती करण्यावरच भर दिला. गालवान घटनेने भारताचा आक्रमक पवित्रा दिसून आला असला तरी त्यामागे गेली सहा वर्षे शांतपणे सीमावर्ती भागात संरक्षणदृष्ट्या महत्त्वाच्या रस्त्यांचे बांधकाम, अवजड लष्करी साहित्याचे वजन पेलू

शकतील असे पुल, तसेच सीमारेषेला समांतर आणि कोणत्याही हवामानात टिकू शकतील असे रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यावर भर देण्यात आला हेच चीनच्या जळफळाटाचे महत्त्वाचे कारण आहे.

प्रत्यक्ष लडाख सीमेवर दुर्बुक-शियॉक-दौलतबेगओल्डी रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. गालवान घटनेनंतरही ते थांबलेले नाही, उलट अधिक वेगाने सुरु आहे. दौलतबेगओल्डी येथील लष्कराच्या तळावर अवजड लष्करी सामग्री वाहून नेणारी विमाने उतरतील अशी हवाईपट्टी कार्यरत झाली आहे. सियाचेन ग्लेशियरवर भारतीय लष्कर सज्ज आहे. हे तळ असे आहेत की आणीबाणीच्या परिस्थितीत पाकिस्तानच्या हद्दीत चीन बांधत असलेला चायना पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडार (CPEC) रस्ता भारत ताब्यात घेऊ शकतो, अक्साई चीनवर मनात आणले तर ताबा मिळवू शकतो आणि काराकोरम खिंडही रोखू शकतो. भारताची ही आक्रमक सज्जता चीन पूर्णपणे ओळखून आहे, पण हे सर्व इतक्या कमी कालावधित भारत करुन दाखविल याची मात्र त्याला कल्पना नव्हती. गुगलवरील अनेक वार्तालेख, व्हिडिओ पाहिल्यास याची कुणाही नागरिकाला कल्पना येऊ शकेल.

मात्र मिडियातील घरभेदी आणि बुद्धीभेदी हस्तकांच्या करवी भारतीयांचा आत्मविश्वास डळमळीत व्हावा म्हणून चीनने सायकॉलॉजिकल वॉर व प्रपोगंडा वॉर सुरु केला आहे. त्याला बळी न पडता देशाचे नेतृत्त्व करणाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि अक्साई चीन ताब्यात घेण्याचा जाहीर मनोदय आपल्या गृहमंत्र्यांनी या पुर्वीच व्यक्त केला आहे. भारताच्या या आक्रमक रणनितीचा परिणाम म्हणून जागतीक पातळीवर एकटा पडलेला चीन, लडाख सीमेवर वातावरण तापवण्याचा प्रयत्न करीत आहे. ●●

## गुवाहाटित 'मॉब लिंचिंग' ची घटना.
## शांतीदुतांनी ऋतुपर्णची भरदिवसा हत्या केली.
## मिडियाचे नेहमीप्रमाणेच मौन.

**अशा प्रकारच्या घटनांमध्ये मिडियातील डावे आणि पुरोगामी नेहमीच दुटप्पी आणि पक्षपाती भूमिका घेतात. परिणामी शांतीदुत गुंडांची पाठराखण करणाऱ्यांची एक फळीच देशपातळीवर तयार झाली आहे. त्यामुळेच दिल्लीतील दंगेखोरांना वाचवण्यासाठी आज विचारवंत म्हणवून घेणारे लेखक आणि पत्रकार पुढे सरसावले आहेत.**

**शांतीदुतांचा जमाव जरासे काही झाले तरी हिंसाचार करीत सुटतो, पोलिसांवर हल्ले करतो आणि कायद्याला आणि संविधानालाही फाट्यावर मारतो. आपले आंदोलन कसे न्याय्य आहे हे दाखवण्यासाठी हातात तिरंगा घेण्याचे नवीन तंत्र त्यांनी उपयोगात आणले आहे. असल्या 'नाटकांची' पाठराखण करणारे मिडियात मोठ्या संख्येत आहेत याची खात्री असल्यानेच अशी आंदोलने यापुढेही होतील यात शंका नाही.**



ऋतुपर्ण

असमिया समाज परंपरेने शांततामय सहजीवनावर विश्वास ठेवणारा, पण गेल्या काही वर्षात शांतीदुतांनी असमिया समाजावर हल्ले करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. अशाच प्रकारची घटना १३ जून २०२०, रोजी गुवाहाटीत घडली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्याप्रमाणे ऋतुपर्ण पेगू हा २६ वर्षांचा तरुण काही खरेदीसाठी अरमान होम फर्निशिंग दुकानात गेला. काही कारणाने दुकानातील हुसेन अली बरोबर त्याची शाब्दीक वादावादी झाली. अशाप्रकारच्या छोट्या-मोठ्या घटना घडतच असतात आणि काही वेळाने वातावरण शांत ही होते. पण असे झाले नाही. शब्दीक वादावादीतून हुसेन अलीने ऋतुपर्णवर चाकूने वार केले. त्या बरोबर आजूबाजूचे शांतीदूत हुसेन अलीच्या मदतीसाठी धावून आले आणि सर्वांनी मिळून ऋतुपर्णला जबरदस्त मारहाण केली. भर रस्त्यात ऋतुपर्ण रक्ताच्या थारोळ्यात पडला. काही जणांनी जखमी ऋतुपर्णला हॉस्पिटलमध्ये नेले. पण काही उपयोग झाला नाही. अतिरक्तस्त्राव झाल्यामुळे हॉस्पिटलमधेच ऋतुपर्णने प्राण सोडले.



**अटक करण्यात आलेले शांतीदूत**

ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि जमाव एकत्र आला. जमावाने अरमान फर्निशिंगवर दगडफेक केली. एवढे झाल्यावर पोलीस घटनास्थळी आले. जमावाची समजूत काढायचा प्रयत्न पोलिसांनी केला. सौम्य लठीमारही केला. तेंव्हा जमावतील नेत्यांनी गुन्हेगारांना पकडून त्यांच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल यांनीही पोलिसांना त्वरित कारवाई करण्याची सूचना केली. त्यानुसार ऋतुपर्णवर प्रथम हल्ला करणारा हुसेन अली, त्याच प्रमाणे दुलाल अली, इब्राहिम अली, मालक आरमान अली व मुनव्वर खातून यांना अटक केली व इं. पि. कोड १४७, १४८, १४९ व ३०२ खाली खुनाचा गुन्हा दाखल केला.

हा दिवस ढवळ्या मॉब लिचिंगचा प्रकार घडूनही स्थानिक वर्तमान पत्रे सोडता मिडियाने या घटनेची अजिबात दखल घेतली नाही. या प्रकरणाची अखलाखच्या हत्येच्या प्रकाराशी तुलना केली की आपल्याकडील इलेक्ट्रॉनिक मिडिया, वर्तमान पत्रे, पुरोगामी पत्रकार, डावे लेखक मॉब लिंचिंग बाबत किती पक्षपाती, दुटप्पी भूमिका घेतात हे दिसून येईल. ऋतुपर्ण ऐवजी एखाद्या हुसेनची जमावाकडून हत्या झाली असती तर याच मंडळींनी केवढे आकांडतांडव केले असते त्याची कल्पना करुन बघा. शांतीदुतांना समज देण्याची तर बातच सोडा! असा विषय पुरोगाम्यांच्या विरोधात जाणारा असला म्हणजेच हत्यारे शांतीदूत असले की 'गुन्हेगारांना धर्म नसतो' हे वाक्य तोंडावर फेकायला यांना बिलकुल संकोच वाटत नाही. एवढी ही मंडळी निर्ढावली आहेत. ●●

**खरा भारत**

# श्रावण बाळाची आठवण करुन देणारी ज्योती पासवान

नरेंद्र प्रभू, सांताक्रुज मुंबई
९९८७००३६९०

♦●♦●♦

श्रावण बाळाच्या गोष्टीची आठवण करुन देणाऱ्या या घटनेची दखल जागतीक महासत्तेचं केंद्रस्थान असलेल्या व्हाईट हाऊसमधून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांच्या कन्या इव्हांका ट्रंप यानी घेतली आणि ज्योती पासवान हे नाव माध्यमात गाजू लागलं. मग तिच्याकडे मदतीचा ओघ सुरु झाला. केंद्रीय क्रिडा मंत्री किरण रिजीजू यांनी भारतीय सायकलींग फेडरेशनला तिच्या कौशल्याची चाचणी घ्यायचे आदेश दिले. मंडळी SSS! आपत्तीच्या काळात प्रथम स्वतःच मदत केली पाहीजे. सरकार किंवा अन्य कुणी तरी येवून मदत करेल म्हणून हातपाय गाळून वाट पहाणाऱ्यांच्या यादीत जमा न होणारा हा आजच्या 'खऱ्या भारताचा' चेहरा आहे.

♦●♦●♦

---

राष्ट्रावर आपत्ती आली की ती दूर करताना सर्वात जास्त महत्त्वाची गोष्ट ठरते ती म्हणजे मदत. संकटग्रस्तांना जो मदत करतो तो श्रेष्ठच, पण स्वतः संकटग्रस्त असूनही जो इतरांच्या मदतीसाठी धावून जातो तो कौतुकास अधिक पात्र ठरतो.

या जागतिक संकटात अगतीक झालेल्यांना मदतीचा हात द्यायचं काम ठिकठिकाणची सरकारं आणि स्वयंसेवीसंस्था करीतच आहेत, पण वैयक्तिक पातळीवर मदत करणाऱ्यांची संख्याही फार मोठी आहे. आणखीही एक वर्ग असा आहे, की जो स्वतःच धडपड करुन किनारा गाठत आहे. मंडळी हाच 'खरा भारत' आहे जो कोणत्याही संकटाचा धैर्याने मुकाबला करु शकतो आणि स्वतःबरोबरच देशालाही या खाईमधून बाहेर काढू शकतो. अशापैकी काही व्यक्तींच्या कार्याचा परिचय 'खरा भारत' या सदरात पुढील काही अंकातून करुन देण्यात येईल. - संपादक

---

## ज्योती पासवान

दिल्लीला लागून असलेल्या हरयाणामधल्या गुरुग्राममध्ये मोहन पासवान हा बिहारच्या दरभंगा इथला मुळ रहिवासी रिक्शा चालवत असे. एका अपघातात तो जखमी झाला आणि त्याची ज्योती ही १४-१५ वर्षांची मुलगी आपल्या वडीलांना जेवण आणि देखभाल करायला म्हणून गावाहून गुरुग्रामला घेऊन आली. कोव्हीड-१९ च्या महामारीने सगळंच ठप्प पडलं आणि मोहन पासवानची रिक्शाही बंद झाली. भाड्याच्या खोलीचे पैसे भरण्याची ऐपत नसल्याने घरमालक हाकलून द्यायला लागला, तेव्हा जखमी वडीलांना घेऊन कुठे जावं असा प्रश्न ज्योती समोर उभा राहीला.



खायला-प्यायला पैसे नाही, रहायला घर नाही आणि त्यावर महामारीचं संकट, काय करावं? तिच्याजवळ असलेल्या सायकलवर तिचा

भरवसा होता, ती सायकल हाच तिचा एकमेव आधार होता वडीलांना सायकलमागे बसवून आपलं गाव गाठायचं तिने ठरवलं. ज्योतीने आपला बेत वडीलांना सांगितला. ज्योती काय दिव्य करायला निघालीय याची त्या बापाला कल्पना होती. त्यांनी नकार दिला, पण ज्योती ठाम होती. अखेर मोजके कपडे आणि वडीलांना घेऊन ज्योतीने गुरुग्राम सोडलं. तिला बिहार दरभंगामधल्या सिरहुल्ली या गावी पोहोचायचं होतं. दहा-वीस नव्हे, तर तब्बल १२०० किलोमिटरचं अंतर सायकलने पार करायचं होतं.



सायकल चालवता येते, मग गुरुग्राममध्ये भुके-कंगाल होऊन मरण्यापेक्षा गावी जायला निघावं, मरण आलंच तर ते रस्त्यावर आलं तरी बेहत्तर पण रस्त्याला लागायचं एवढ्याच निश्चयावर तिने वाटचाल सुरु केली. वाटेत कधी एखादा ट्रक किंवा ट्रॅक्टर थोडं अंतर पार करुन द्यायचे, तेव्हढाच दिलासा! पुन्हा मजल दरमजल करुन लक्ष्याकडे जाणं सुरुच होतं.

कोरोना महामारीने रस्ते, बाजारपेठा उजाड पडलेल्या. एखाद्या धाब्यावर अन्न मिळायचं कधी ताजं कधी शिळं, कधी मनाजोगं कधी डोळ्यात पाणी आणणारं. तिचे पाय खुप दुखायचे. वडील, “दाबून देऊ का?” विचारायचे पण ती नकार देत राहिली. ज्योतीने धीर सोडला नाही आणि ती वडीलांना घेऊन घराच्या दारापर्यंत आली. आईला हाक मारली.

कोरोनाचं संकट तर जगव्यापून राहिलं होतं. तिचं गावही त्याला अपवाद नव्हतं. सायकलने १२०० किलोमिटरचा रस्ता मोजत थकून भागून जिव टाकायला आलेल्या ज्योतीला विलगीकरणासाठी गावातल्या शाळेत पाठवलं गेलं. तिने तेही दिवस काढले. जगण्याच्या या कठीण परिक्षेतून गेल्यावर ती आपल्या घरात प्रवेशकर्ती झाली.

श्रावण बाळाच्या गोष्टीतील आठवण करुन देणाऱ्या या घटनेची दखल जागतीक महासत्तेचं केंद्रस्थान असलेल्या व्हाईट हाऊसमधून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांच्या कन्या इव्हांका ट्रंप यानी घेतली आणि ज्योती पासवान हे नाव माध्यमात गाजू लागलं. मग तिच्याकडे मदतीचा ओघ सुरु झाला. केंद्रीय क्रिडा मंत्री किरण रिजीजू यांनी भारतीय सायकलींग फेडरेशनला तिच्या कौशल्याची चाचणी घ्यायचे आदेश दिले.

मंडळी ऽऽऽ! आपत्तीच्या काळात प्रथम स्वत:च मदत केली पाहीजे. सरकार किंवा अन्य कुणी तरी येवून मदत करेल म्हणून हातपाय गाळून वाट पहाणाऱ्यांच्या यादीत जमा न होणारा हा आजच्या ‘खऱ्या भारताचा’ चेहरा आहे. अशी हजारो उदाहरणं असतील, त्यातीलच ही एक प्रातिनिधीक कहाणी.●●

---

## पुढील अंकात

**नागाप्रदेश : खंडणीखोरांच्या विळख्यात**

- अक्षय फाटक, डोंबिवली

**विस्मयकारक मिझोरम**

- सुनिल किटकरु, नागपूर

**टॅटू आर्टिस्टची लॉकडाऊन डायरी**

- सुभाष जोशी

**मिझोरम : दुकानदाराशिवायचे दुकान**

- विद्या गोगटे

# त्युएनसँगमध्ये नागालँड सरकार विरोधात तीव्र निदर्शने
## कोरोना रुग्णांच्या बाबतीत निष्काळजीपणाचा कळस

**पुरुषोत्तम रानडे**, डोंबिवली
९९६९०३८७५९

♦●♦●♦

**विकास कामांसाठी केंद्राकडून मिळणारा पैसा राज्यकर्ते, प्रशासनातील अधिकारी आणि भूमिगत संघटनांच्या म्होरक्यांच्या खिशात जातो हे नागा प्रदेशातील जनता पूर्णपणे ओळखून आहे. त्यामुळेच कितीही आंदोलने झाली तरी नागा प्रदेशातील जनतेला न्याय मिळू शकत नाही. ईस्टर्न नागा प्युपल्स ऑर्गनायझेशन (ENPO) याच कारणांमुळे फ्रंटियर नागालँडची (पूर्वीय नागा प्रदेशाची) मागणी सातत्याने करीत आहे. अशी परिस्थिती जेव्हां उद्भवते तेव्हां "नागा ऐक्याचे" भावनिक आवाहन करुन मामला शांत केला जातो.**

♦●♦●♦

कोरोना व्हायरसच्या साथीच्या काळात नागा प्रदेशातील राजकीय वातावरण तसं शांत होतं. पण चेन्नईहून दिमापूरमार्गे जस-जसे नागा नागरिकांचे येणे सुरु झाले तस-तसे राजकीय वातावरणही चांगलेच तापू लागले. त्याला तोंड फुटले, एका प्रसंगाने. २२ मे रोजी काही नागरिक दिमापूर रेल्वे स्टेशनला उतरले आणि त्यांना कोहिमा येथे बसने आणून क्वारंटाईन केले गेले. त्यांची कोरोना चाचणीही करण्यात आली. नंतर मंगळवार दि. २६ मे रोजी १५० नागरिकांना ५ बसमधून त्युएनसँग येथे संध्याकाळी पाठवण्यात आले. पूर्ण रात्रभराचा प्रवास असतांनाही त्यांच्या जेवणाची कोणतीच सोय प्रशासनाने केली नाही. त्या ऐवजी प्रत्येक प्रवाश्याला ३ मारी बिस्किटे आणि पाण्याची बाटली देण्यात आली.

त्युएनसँग येथे दुसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी हे नागरिक पोहोचल्यावर क्वारंटाईन होण्या अगोदर त्यांची कोरोना चाचणी केली असता त्यापैकी १ प्रवासी कोरोना पॉझिटिव्ह असल्याचे उघड झाले. त्या बरोबर एकच खळबळ उडाली. चांग स्टुडंट्स युनियन आणि ईस्टर्न नागालँड प्युपल्स ऑर्गनायझेशनने (ENPO) त्या विरोधात आवाज उठवल्यावर **आरोग्य मंत्री S. Pananya Phome** अन्य अधिकाऱ्यांसह त्युएनसँग येथे धावले. त्या वेळी चांग स्टूडंट्स युनियनने तीव्र निदर्शने केली. निदर्शनाचा भाग म्हणून आरोग्यमंत्र्यांना मारी बिस्किटे आणि पाण्याची बाटली भेट देण्यात आली. "तुम्ही आम्हांला जे दिलंत तेच तुम्हांला आम्ही परत केलं" या शब्दात या अनोख्या निदर्शनाचं समर्थन करण्यात आलं. "नशिब तुमचं की आम्ही गाड्यांवर दगड फेकले नाहीत", असंही स्टुडंट्स युनियनने बजावलं.

त्युएनसँग येथे आरोग्यमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीत बीएसएल - ३ लॅब बसवण्याचं मान्य केलं. या सर्व प्रकाराबाबत बोलताना स्टुडंट ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष चिंगलाख म्हणाले की, लॅब देण्यात यावी म्हणून नागालँड शासनाकडे दोन महिने अगोदर आम्ही मागणी केली होती. त्युएनसँग येथील

हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स व नर्स यांची कमतरता आहे ती पुरवावी अशी ही मागणी आम्ही अनेकदा केली, परंतू आमची मागणी मान्य झाली नाही. इतकंच नव्हे तर नागालँड प्रशासनाने आपल्याच नियमांचं उल्लंघन करुन १४ दिवसांचा क्वारंटाईन करण्याचा नियम असतांना केवळ तीन दिवसातच सर्व प्रवाशांची रवानगी केली. त्यांच्या चाचण्यांचे रिपोर्ट येईपर्यंतही थांबण्याचे सौजन्य दाखवले गेले नाही. प्रवासात त्यांच्या जेवणाचीही व्यवस्था केली गेली नाही. काही स्वयंसेवी संस्थांना प्रवाशांच्या भोजनाची व्यवस्था करावी लागली. हे सर्व प्रवासी त्युअेनसँगमधील असल्यानेच शासनाने इतकी बेपर्वाई दाखवली.

ईस्टर्न नागालँडमधील त्युअेनसँग, मोन इत्यादी जिल्ह्यातील आदिवासी जमातींच्या बाबतीत नेहमीच असा भेदभाव केला जातो असा आरोप ईस्टर्न नागालँड प्युपल्स ऑर्गनायझेशन तर्फे केला गेला. धड आरोग्य व्यवस्था नाही, शिक्षणाची सोय नाही, रस्ते चांगले नाहीत, पाण्याची सोय नाही, चांगले मार्केटही नाही प्रत्येक बाबतीत आमच्यावर अन्याय केला जातो, भेदभाव बाळगला जातो. स्टुडंट्स युनियनच्या अध्यक्षांनी केलेले हे आरोप खरेच आहेत हे मोन, त्युअेनसँग या म्यानमारजवळील जिल्ह्यात प्रवास करणाऱ्यांना सहज लक्षात येण्यासारखे आहे. नागालँड म्हणजे दिमापूर आणि कोहिमा अशी राज्यकर्त्यांची समजूत असावी. या दोन जिल्ह्यांशिवाय नागा प्रदेशात अत्यंत दुर्गम भागातही गरीब नागा जनता राहते. याकडे राज्यकर्ते आजपावेतो दुर्लक्षच करीत आले आहेत. याच कारणामुळे वर उल्लेखित प्रकरण चिघळले.




विकास कामांसाठी केंद्राकडून मिळणारा पैसा राज्यकर्ते, प्रशासनातील अधिकारी आणि भूमिगत संघटनांच्या म्होरक्यांच्या खिशात जातो हे नागा प्रदेशातील जनता पूर्णपणे ओळखून आहे. त्यामुळेच कितीही आंदोलने झाली तरी नागा प्रदेशातील जनतेला न्याय मिळू शकत नाही. ईस्टर्न नागा प्युपल्स ऑर्गनायझेशन (ENPO) याच कारणांमुळे फ्रंटियर नागालँडची (पूर्वीय नागा प्रदेशाची) मागणी सातत्याने करीत आहे. अशी परिस्थिती जेव्हां उद्‌भवते तेव्हां “नागा ऐक्याचे” भावनिक आवाहन करुन मामला शांत केला जातो. दुर्गम भागातील मुळातच सोशिक असलेल्या नागा जमातींचे शोषण सुरुच राहते. चांग स्टुडंट्स युनियनने प्रकरण लावून धरल्यावर या घटनेला कोण जबाबदार आहे याची चौकशी करुन त्याच्यावर कारवाई केली जाईल असे आश्वासन मुख्यमंत्री नैफ्यू रियो यांनी दिले असले, तरी वरील घटनेचे पडसाद बराच काळ उमटत राहतील यात शंका नाही. ●●

# आसाममधील बोटीतले दवाखाने

**सुभाष जोशी**, डोंबिवली
७०२११३७९१९

♦●♦●♦

**या बेटांवरचे पुरुष रोजगाराच्या शोधात आसामातल्या मोठ्या शहरांकडे धाव घेत असल्याने बेटांवर मुख्यतः महिला आणि मुले यांची संख्याच मोठ्या प्रमाणात आहे. बोटींवरच्या चिकित्सालयातल्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ आजाराचे निदान करण्यासाठी मूलभूत चाचण्या करतो व या चाचण्यांच्या निष्कर्षानुसार बोटींवरील डॉक्टर औषधे लिहून देतात. ही सगळी औषधे बोटींवरील औषधांच्या दुकानातून मोफत दिली जातात.**

♦●♦●♦

ईशान्य भारतातल्या आसाम राज्यातून वाहणाऱ्या ब्रम्हपुत्र नदाच्या पात्रामध्ये अनेक बेटे आहेत. या बेटांना स्थानिक भाषेत "चार" असे म्हणतात. या बेटांवर लहान-लहान गावे वसलेली आहेत. ही गावे म्हणजे आसाममधला अत्यंत अविकसित असा प्रदेश आहे.

आसाममधून वाहणाऱ्या ब्रम्हपुत्र या प्रचंड नदाची लांबी या राज्यात सुमारे ९०० कि. मी. इतकी आहे व या नदीच्या पात्रात २५०० इतक्या संख्येत लहान-मोठी बेटे तयार झाली आहेत. या बेटांवर सुमारे अडीच लाख लोक राहतात. या पैकी ८० टक्के लोक अतीशय गरीब आहेत. त्यांच्यासाठी आरोग्याच्या व शिक्षणाच्या सुविधा तेथे उपलब्ध नाहीत.

या बेटांवर बाल मृत्यू आणि मातांच्या मृत्यूंचे प्रमाण आसामात सगळ्यात जास्त आहे. तातडीच्या वैद्यकीय सेवा येथे उपलब्ध नाहीत. त्यामुळे एखादी व्यक्ती या बेटांवर जर खूपच आजारी पडली तर त्या रुग्णाला जिल्हा रुग्णालयात उपचाराला नेण्यासाठी ४ ते ६ तास लागतात, कारण मुख्य प्रदेशापासून ही बेटे दूरच्या अंतरावर आहेत. सरकारचे या दृष्टीने केलेले प्रयत्न व हस्तक्षेप अपुरे पडतात.

इ. स. २००४ साली, सेंटर फॉर नॉर्थईस्ट स्टडीज् अँड पॉलीसी रिसर्च (C-NES) या बिनसरकारी संस्थेने या बेटांवरच्या लोकांना वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी "बोटीतले दवाखाने" किंवा "चिकित्सालये" सुरु केली. या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी केवळ बोट हे एकच साधन आहे.

या बेटांवर राहणाऱ्या जमातींच्या लहान मुलांचे लसीकरण करणे, महिलांच्या आरोग्यासाठी उपचार करणे, लोकांना कुटुंब नियोजनासाठी समुपदेशन करणे आणि लोकांना लागणाऱ्या मूलभूत वैद्यकीय सेवांची पूर्तता करणे इत्यादी आगळ्या-वेगळ्या उपक्रमांवर या संस्थेने आपले लक्ष केंद्रीत केले आहे. संस्थेकडे एकूण १५ बोटीतले दवाखाने आहेत. ब्रम्हपुत्रा नदी आसामातल्या ज्या जिल्ह्यांमधून वाहते त्यापैकी १३ जिल्ह्यातल्या अखत्यारीत येणाऱ्या या बेटांवर दर महिन्याला सुमारे २०,००० लोकांवर या दवाखान्यांमधून मोफत उपचार केले जातात व औषधांचे मोफत वाटप करण्यात येते.

लोअर आसाम जिल्ह्यतील डॉ. रफीक

म्हणतात की, माझ्या फिरत्या बोटीतल्या चिकित्सालयात सुमारे ३३ बेटांतील गांवात राहणाऱ्या लोकांवर उपचार करण्यात येतात. श्वासनलीकेला होणारा जंतुसंसर्ग, घशाचा दाह, घशांतील गाठींची सूज, दमा व कातडीवरच्या बुरशीमुळे झालेला संसर्ग हे या बेटांवरच्या लोकांमध्ये आढळणारे सामान्य आजार आहेत.

बेटांभोवती असलेल्या ब्रम्हपुत्रा नदीचे दुषीत पाणी पिण्यासाठी व अंघोळीसाठी वापरल्याने मुख्यत: काताडीचे रोग होतात. तसेच भात शेती करणाऱ्या लोकांना बुरशी सदृश्य संसर्ग होतो.

आसाम राज्य सरकार, राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य योजना आणि युनिसेफ बोटींवरच्या निदान करण्यासाठी मूलभूत चाचण्या करतो व या चाचण्यांच्या निष्कर्षानुसार बोटींवरील डॉक्टर औषधे लिहून देतात. ही सगळी औषधे बोटींवरील औषधांच्या दुकानातून मोफत दिली जातात.

सध्या देशभर कोविद-१९ या महामारीचा उद्रेक झाला आहे. त्यामुळे या बेटांवर राहणाऱ्या लोकांचा कोविद-१९ पासून बचाव व्हावा व संसर्ग झालाच तर त्यावर मात करता यावी म्हणून सगळ्या बोटींतील चिकित्सालयातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी विविध मार्गांचा अबलंब केला आहे. बेटांवरील सगळ्या लोकांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. कोविद-१९ बद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येत आहे. बेटांवरचे लोक अत्यंत



बोटीतील दवाखाना

चिकित्सालयांसाठी निधी उपलब्ध करुन देतात. त्यामुळे ही चिकित्सालये म्हणजे बेटांवर राहणाऱ्या लोकांसाठी वरदानच ठरली आहेत.

या बेटांवरचे पुरुष रोजगाराच्या शोधात आसामातल्या मोठ्या शहरांकडे धाव घेत असल्याने बेटांवर मुख्यत: महिला आणि मुले यांची संख्याच मोठ्या प्रमाणात आहे. बोटींवरच्या चिकित्सालयातल्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ आजाराचे गरीब असल्याने त्यांच्यात रोग प्रतिकार शक्ती निर्माण होण्यासाठी योग्य अन्न पदार्थ मोफत देण्यात येत आहेत. बेटांवरचे बहुतेक लोक हे रोजंदारीने काम करणारे मजूर आहेत. पण लॉकडाऊनमुळे जवळपासच्या शहरांमध्ये जाऊन काम मिळविण्याचा मार्ग बंद झाला आहे. अशा असहाय्य स्थितीतल्या या बेटांवरच्या लोकांसाठी हे बोटीतले कर्मचारी आपल्या प्रयत्नांची शर्थ करीत आहेत. ●●

# अरुणाचल प्रदेशातील दापोरीजो पुल

♦●♦●♦

**हा पुल बांधून पूर्ण करण्यासाठी बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनला दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. पण BRO ने हा पुल १ महिन्यात बांधून पूर्ण केला. कोविद-१९ चा धोका असून ही योग्य ते नियम पाळून BRO ने कमी अवधित पुलाचे काम पूर्ण केले. नेहमीच्या पुलापेक्षा दापोरीजो पुलाचे डिझाइन व रचना ही अत्यंत वेगळी आहे. पुणे येथे असलेल्या मिलीटरी इंजिनीअरींग कॉलेज मधल्या या विषयातील तज्ञ अभियंत्यांबरोबर चर्चा करुन व त्यांच्या सल्ल्याने या पुलाचे डिझाइन व रचना निश्चित करण्यात आली आहे.**

♦●♦●♦

ईशान्य भारतातले अरुणाचल प्रदेश हे राज्य भारत आणि चीन यांच्या सीमारेषेवर वसलेले आहे. त्यामुळे या राज्यात दळण-वळणांच्या साधनांचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात येतो. आपल्या देशाच्या सीमावर्ती भागात रस्ते, पूल, बोगदे, विमानतळ इत्यादी मूलभूत सुविधांचा विकास व त्यांची देखभाल करण्यासाठी बॉर्डर रोड ऑरगनायझेशन (BRO) या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

कोविद-१९ च्या उद्रेकामुळे मार्च २०२० च्या मध्यापासून लॉकडाऊन असल्याने या काळात BRO ने अरुणाचल प्रदेशात एक महत्त्वाचा आणि मोक्याच्या जागेवर असलेला पुल बांधून पूर्ण केला आहे. या काळात रस्ते वाहतूक मंदावली होती. अरुणाचल प्रदेशातल्या अप्पर सुबानसिरी जिल्ह्यातल्या सुबानसिरी नदीवर दापोरीजो येथे BRO ने हा ४३० फूट लांबीचा पुल बांधला आहे. अरुणाचल प्रदेशातल्या भारत व चिन यांच्यामधील नियंत्रण रेषेवर सुमारे ३००० सैनिक भारतीय लष्करातर्फे तैनात केलेले आहेत. दापोरीजो पुलामुळे या सगळ्या सैन्याला लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणे शक्य होणार आहे.

या पुलाचे बांधकाम बॉर्डर रोड टास्क फोर्स (BRTF) ने १७ मार्च २०२० रोजी सुरु केले व १४ एप्रिल २०२० रोजी बांधकाम यशस्वीपणे पूर्ण केले. अरुणाचल प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांनी २० एप्रिल रोजी या पूलाचे उद्‌घाटन सुद्धा केले.

**या पुलाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत -**

- हा पुल सार्वजनिक बांधकाम खाते बांधणार होते पण सीमारेषेपाशी असल्याने BRO ने पुल बांधण्याची जबाबदारी स्वीकारली.
- BRO ने या पुलाची वजन सहन करण्याची क्षमता ४० टन इतकी वाढीव ठेवली त्यामुळे अतिशय वजनदार अशा तोफा नियंत्रण रेखेवर नेण्यासाठी या पुलाचा उपयोग करता येईल.
- भारत-चीन सीमा रेषेवर असलेले सैनिक व कर्मचारी तसेच या नियंत्रण रेषेवरच्या आजू-बाजूला असलेली सुमारे ४५१ खेड्यातली कुटुंबे यांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तूंची वाहतुक या पुलामुळे शक्य होईल.
- हा पुल बांधून पूर्ण करण्यासाठी BRO ला दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. पण BRO ने हा पुल १ महिन्यात बांधून पूर्ण केला. कोविद-१९ चा धोका असून ही योग्य ते नियम

पाळून BRO ने कमी अवधित पुलाचे काम पूर्ण केले.

- नेहमीच्या पुलापेक्षा दापोरीजो पुलाचे डिझाइन व रचना ही अत्यंत वेगळी आहे. पुणे येथे असलेल्या मिलीटरी इंजिनीअरींग कॉलेज मधल्या या विषयातील तज्ञ अभियंत्यांबरोबर चर्चा करुन व त्यांच्या सल्ल्याने या पुलाचे डिझाइन व रचना निश्चित करण्यात आली आहे.
- दापोरीजो येथे सुबानसिरी नदीवर एक जुना पुल अस्तीत्वात होता. सन १९९२ साली हा पुल बांधण्यात आला. पण हा जुना पुल अतिशय मोडकळीस आला होता. तसेच या पुलाची वजन पेलण्याची क्षमता खूप कमी होती. त्यामुळे BRO ने या नदीवर नवीन पुल बांधला ज्याची क्षमता पण जास्त आहे व त्याचे डिझाइन व रचना आधुनिक आहे
- अरुणाचल प्रदेशात दोन महत्त्वाचे मुख्य रस्ते आहेत. ईटानगर-झिरो-रागा-दापोरीजो असा एक मार्ग व दुसरा मार्ग म्हणजे लीकाबाली-बासार-दापोरीजो या शहरांना जोडण्यारा रस्ता. या मार्गांवर सुबानसिरी ही नदी असल्याने दापोरीजो येथे या नदीवर दोन मुख्य पुल होते. नियंत्रण रेषेवर तैनात असलेल्या सैनीकांसाठी व नजीकच्या ६०० पेक्षा जास्त खेड्यांतील लोकांसाठी गरजेच्या वस्तू, अन्न-धान्य आणि सैन्यासाठी दारुगोळा, बंदुका इत्यादींचा पुरवठा करण्यासाठी या दोन्ही मुख्य पुलांचा उपयोग होत असे.

पण हे पुल खूप जुने असल्याने व त्यांचा सतत वापर झाल्याने तसेच हवामानाच्या परीणामाने मोडकळीस आले होते. त्यांची वजन पेलण्याची क्षमता ९ टन इतकी कमी झाल्याने अप्पर सुबानसिरी जिल्ह्यातल्या नागरिकांसाठी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा योग्य प्रमाणात होत नव्हता. BRO या पुलांची देखभाल करीत असे. त्यामुळे नियमित तपासणी करतांना तज्ञांना असे आढळले की या पुलांना तडे गेले आहेत. म्हणून BRO ने नवीन पुलाचे काम हाती घेऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले. ●●



**- प्रतिनिधी**

## मेघालय सेवा भारतीच्या मदत कार्याचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

पेनुरसुला जवळील एका गावात तर त्या गावातील सरपंचाने सर्वत्र ध्वनीवर्धकावरुन सर्व गावकऱ्यांना सुचना दिल्या की संघाचे कार्यकर्ते आपल्या गावात आज शिधा वाटप करणार आहेत. त्याप्रमाणे स्वयंसेवकांनी घराघरात जावून शिधा वाटप केले. ह्या सर्व दोन महिन्यांच्या काळात शहरातील ५३ विभागातून व १०५ गावातून जवळ-जवळ ७ हजार कुटुंबांना मदत करण्यात आली.

या शिवाय कार्यकर्त्यांनी स्वत:हून आपल्या भागात गस्तीवर असणाऱ्या CRPF व मेघालय पोलिसांना संध्याकाळी चहा व बिस्किटांचे वाटप केले. एक चमूने तर ७५ दिवस रोज किमान १०० पोलिसांना ही सेवा पूरवली.

लॉकडाऊनच्या काळात रुग्णालयात घेऊन जाणे, रक्तदाता उपलब्ध करुन देणे, प्रशासनाला मदत करणे, तसेच निर्जंतुकिकरणाचे काम ही केले. या सगळ्या कामाची दखल प्रशासनाने घेतली. मा. मुख्यमंत्री कोनरॉड संगमा यांनी पत्राद्वारे कौतुक व आभार व्यक्त केले. पुढील काळातही सेवा भारती, मेघालय व रा. स्व. संघ अशीच मदत प्रशासनाला करील अशी असा त्यांनी व्यक्त केली. मेघालयाचे राज्यपाल यांनी देखील स्थानिक वतमान पत्रात या कार्याची प्रशंसा केली आहे. ●●

## मिझोराम चर्चकडून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रशंसा!

दिल्लीत, लॉकडाऊनमुळे स्थलांतरीत मजुरच प्रभावित झाले नसून, ईशान्य भारतातले दिल्लीतच वास्तव्याला असलेले व नोकरी व्यवसाय करणारे शेकडो लोक प्रभावित झाले आहेत.

लॉकडाऊन जाहीर झाल्यावर पहिल्याच आठवड्यात संघाच्या दिल्ली प्रांताने, ईशान्य भारतातल्यादिल्लीतीलविद्यार्थ्यांच्यामदतीसाठीएक भ्रमणध्वनी क्रमांक जाहीर केला होता. तेव्हांपासून पश्चिम दिल्लीतील उत्तमनगर विभागातील मुख्यत: मिझोराम येथून आलेल्या पन्नास कुटुंबांना संघ स्वयंसेवकांनी रोजच्या गरजेच्या वस्तु पुरविल्या आहेत. या पन्नास कुटुंबांत सुमारे २३५ व्यक्ती आहेत. प्रत्येक कुटुंबाला ५ किलो तांदुळ, २ किलो पीठ, १ किलो डाळ, १ किलो चणे अथवा हरभरे व इतर वस्तुंचे एक पुडके देण्यात आले आहे.

मिझोराम मधून आलेली ही कुटुंबे बहुसंख्येने ख्रिश्चन धर्माची आहेत. पण संघ स्वयंसेवकांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून या सगळ्यांना लागणारा शिधा स्थानिक चर्चच्या स्वाधीन केला व चर्च त्याचे वाटप करणार आहे. या "झोमी" चर्चचे धर्मोपदेशक श्री. चॅन खानखूप यांनी वेळेवर मदतीसाठी धावून आलेल्या संघ स्वयंसेवकांचे आभार मानले व त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ईशान्य भारतातील दिल्लीतील कुटुंबांना मदत करण्याच्या आपल्या कार्याबाबत तेथील सहकार्यवाह म्हणतात की, ईशान्य भारतातील लोक आपल्यापेक्षा वेगळे नाहीत तर ते आपल्या कुटुंबाचे घटकच आहेत. ते त्यांच्या राज्यातील घरापासून अतीदूर असलेल्या दिल्लीत रहात आहेत याचा अर्थ ते परदेशात रहात आहेत अस नव्हे. हे सुद्धा त्यांचे स्वत:चेच घर आहे. त्यामुळे लॉकडाऊनच्या काळात त्यांना अन्न व शिधा पुरविणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो व तेच आमचे उद्दिष्ट आहे. ●●

# सेवा भारती, मेघालय : मदतकार्याचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

- राजेश राव, शिलाँग - ०९४२२७०२२८३

पुर्वांचलात कोरोना या साथीची लक्षणे दिसू लागताच त्यावर खबरदारी म्हणून येथे देखील सर्वत्र लॉकडाऊन देशातील इतर भागा प्रमाणेच २४ मार्चला सुरु झाले. मार्च महीना मेघालयाच्या दृष्टीने पर्यटक मोठ्या प्रमाणात इथे येण्याचा काळ व त्यामुळे येथील स्थानीक लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्याचा व वर्षातील सर्वात अधिक कमाई करण्याचा काळ. परंतु नेमके याच महीन्यात देशभरात कोरोनाने धुमाकुळ घालायला सुरुवात केली. मेघालय सरकारने देशभरातील लॉकडाऊन सुरु होण्यापूर्वीच इथे बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना अटकाव करायला सुरुवात केली. दिनांक १८ मार्च पासुनच सर्व पर्यटन स्थळे बंद करायला सरकारने सुरुवात केली. त्या त्या गावातील लोकांनी देखील बाहेरील वाहने आपल्या गावात येण्यापासुन रोखायला सुरुवात केली. यामुळेच कदाचीत मेघालयात कोरोनाने जास्त थैमान घातले नाही.




आधिच रोजगाराची साधने उपलब्ध नाहीत. त्यातुन पर्यटन बंद आणि लॉकडाऊन याचा परीणाम येथे शहरी आणि ग्रामीण जनतेवर झाला. घरातील परीस्थिती यथा-तथा, अनेक जण रोजंदारीवर पोट भरणारे व सर्व व्यवहार ठप्प झाल्यामुळे खायचे हाल सुरु झाले.




ही परिस्थिती लक्षात घेवून अनेक स्वयंसेवी संघटना मदत करण्यासाठी पुढे आल्यात. रा. स्व. संघाने देखील मदत कर्याचे निश्चित केले. आवश्यकता लक्षात घेतली आणि शिधा वाटप व भोजन वितरण या दोन गोष्टींवर लक्ष केंद्रीत करायचे ठरवले. परंतु असे कोणतेही कार्य करायचे तर जिल्हाधिकारी यांची परवानगी आवश्यक होती. म्हणून रा. स्व. संघाच्या नावाने व सेवा भारती मेघालय या नावाने अर्ज करुन परवानगी मागितली. परंतु संघाच्या नावाने अर्ज असल्यामुळे सुरुवातीला परवानगी मिळायला जरा वेळ लागला.

त्या तीन-चार दिवसात असे लक्षात आले की भोजन वितरणाचे काम अनेक संघटना, ज्यात बिहारी युवा मंच, बंगाली असोसिएशन, गुरुद्वारा प्रबंध कमीटी, युनायटेड शिख संस्था, अशा संस्था करत होत्या. त्यामुळे त्यांची एक स्वतंत्र बैठक घेउन कोणत्या संस्था, कोणत्या भागात भोजन वितरण करतील याची योजना तयार केली व त्याप्रमाणे स्थानीक स्वयंसेवकांच्या मदतीने या संस्था भोजन वितरण करु लागल्या. सर्व संस्था मिळून जवळ-जवळ दोन ते अडीच हजार लोकांना रोज भोजन वितरणाचे काम जवळ-जवळ तीन आठवडे करत होते. त्यामुळे गरीब, गरजू लोकांचा भोजनाचा प्रश्न थोड्या दिवसांकरीता संपला होता.




परंतु या व्यतिरिक्त असे अनेक परीवार होते की ज्यांना शिधा पोहोचवणे आवश्यक होते. त्यामुळे परवानगी मिळाल्यावर दि. २८ मार्च पासून रा. स्व. संघ व सेवा भारती मेघालय यांच्या वतीने शिधा वाटपाचे काम सुरु झाले. प्रत्येक वस्तीत गरजू लोकांच्या याद्या करायला सुरुवात झाली. दोन केंद्रात शिधा किट ज्यात तांदुळ, डाळ, तेल, मीठ व बटाटे याचा समावेश होता, तयार करुन त्यांचे वितरण वस्त्या-वस्त्यातून सुरु झाले.



हे वितरण सुरु असतांना असे लक्षात आले की, अन्य-अन्य राज्यातून, जसे अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मणिपूर, नागालँड व त्रिपुरा येथील अनेक विद्यार्थी शिलाँगमध्ये शिक्षणाच्या निमीत्ताने राहात आहेत आणि त्यांना देखील शिधा पोहचवणे आवश्यक आहे.

तेव्हा अशा विद्यार्थ्यांची यादी करण्याचे व त्यांना शिधा पोहचवण्याचे काम अखिल भारतीय विद्यार्थी परीषदेच्या कार्यालयातून सुरु झाले. जवळ-जवळ ५५० विद्यार्थ्यांना लॉकडाऊनच्या काळात मदत केली गेली. या शिवाय अनेक गावातून संघाच्या कार्यकर्त्यांनी गरजू लोकांची यादी करुन त्याप्रमाणे शिधा त्या त्या गावात पाठवण्याची विनंती केली. त्याप्रमाणे दोन केंद्रातून आवश्यकते नुसार शिधा वेगवेगळ्या गावांना पाठवण्यात आला व तेथील स्थानीक कार्यकर्त्यांनी त्याचे वाटप केले. ●●

# नागा प्रदेशातील ‘एका मास्तरची’ गोष्ट

**संजय काठे**, डोंबिवली
९९६९२१६१७९

♦●♦●♦

**इतकं बोलून रस्सीलुंगने पाकीट माझ्या हाती दिले व वाकून नमस्कारही केला. टचकन डोळ्यात पाणी आले. पेरलेलं कुठेतरी उगवत आहे याची जाणीव झाली आणि भविष्यातील कामासाठी प्रेरणाही मिळाली. निवासस्थानी आल्यावर त्याने दिलेले पाकीट उघडून पाहिले, तर त्यात चक्क २०,०००/- रुपये होते. क्षणभर विश्वास बसत नव्हता. कारण एका माजी विद्यार्थ्याने देणगी म्हणून रोख रक्कम देणे हा माझ्यासाठी पहिलाच अनुभव होता. पैशांपेक्षाही त्यातून दिसून येणारी कृतज्ञतेची भावना लाख मोलाची होती. रस्सीलुंग आता खरंच मोठा झाला होता! खूप मोठा! आभाळा एवढा!!**

♦●♦●♦

१९९९ साली डोंबिवलीत, नागा प्रदेशातील मुलांसाठी एक वसतिगृह सुरु करण्यात आले. दुसरी ते सातवी या वर्गातील दहा विद्यार्थी होते.



**रस्सीलुंग पामे**
**०७०८५६८६३२६**
**०७०८५६८४०३७**

त्यातील रस्सीलुंग एक विद्यार्थी. सहावित शिकणारा. अभ्यासात बऱ्यापैकी प्रगती. परंतु लगेच हमरी-तुमरीवर येणारा. पण स्वधर्माबद्दल आस्था असणारा. रस्सीलुंग खेळाच्या मैदानावर देखील तितकाच आक्रमक.

काही कार्यकर्त्यांचे त्याच्या बद्दल चांगले मत नव्हते. एकदा एक महिला कार्यकर्ती मला म्हणालीदेखील, “या रस्सीला ताबडतोब परत पाठवले पाहिजे. अगदी टाकाऊ मुलगा आहे.” होय, काही वेळा त्याचे हे रुप दिसतही असे. तो महाविद्यालयात असताना वसतिगृहात एक वृद्ध सेवाव्रती व्यवस्थापक होते, त्यांच्याशी उद्धटपणे वागला होता. असे जरी असले तरी आम्हा काही जणांच्यासोबत त्याचे चांगले संबंध होते. बी. ए. केल्यावर त्याने पत्रकारीतेचा डिप्लोमा केला. काही दिवस **‘हिंदुस्थान समाचारमध्ये’** कामही केले. पण तिथे तो रुळला नाही. परत गावी गेला.

गावाला जाऊनही त्याला खुप संघर्ष करावा लागला. आमच्या संपर्कात होता, पण कधी कधी डिप्रेस्ड होत असे. त्याला हिंदी टिचर म्हणून सरकारी नोकरी मिळाली. मात्र पहिलेच पोष्टिंग त्याच्या गावापासून दूर तुएनसँग जिल्ह्यातील एका खेड्यात मिळाले.

रस्सीलुंग, पेरेन जिल्ह्यातील झेलीयांग जमातीचा. त्याची भाषा वेगळी आणि त्याला जिथे शाळेत नोकरी मिळाली तेथील भाषा वेगळी. त्यातुन लहान वर्गातील मुलांना शिकवायचे म्हणजे त्यांच्या मातृभाषेतून शिकविण्याची गरज. पण त्यावर मात करुन तिथे तो स्थिर झाला. हळूहळू त्या शाळेतील मुलांना आपल्या घरी बोलावून त्यांची शिकवणी घेत असे, ती देखील कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता. त्यामुळे त्याचे सहकारी शिक्षक त्याच्यावर

नाराज होत, कारण त्यांचे उत्पन्न बुडत असे ना! बरं मुलं शिकवणीसाठी येत त्यांना प्रसंगी मांसाहारी भोजनही तो देत असे.

मुलांच्या सोबत मैदानात फुटबॉल खेळणे, त्यासाठी बॉल आणून देणे हे ही करत असे. शाळेत कधी अनुपस्थिती नाही, की पाट्या टाकणे नाही. त्यामुळे मुलांमध्ये तो प्रिय झालाच, पण त्या गावात ही सर्वांना हवाहवासा वाटू लागला.

अशाप्रकारे चार वर्षे त्याने तुअेनसँगच्या खेड्यात काम केल्यावर त्याची त्याच्याच गावात बदली झाली. नुसती बदली झाली नाही तर हेडटिचर म्हणून पदोन्नतीवर बदली झाली, म्हणजे दुधात साखर!

रस्सीलुंग बदली होऊन त्याच्या गावातील शाळेत आला; आणि त्या शाळेशी एकरुप झाला. हेड टिचर असल्यामळे शाळेची सर्व जबाबदारी त्याच्यावरच आहे आणि तो ती उत्तमरित्या पार पाडतोय. मार्च २०२० मध्ये तो ठरवून तेनींगच्या शाळेत मला भेटायला आला. दोन वर्षांनी आमची भेट होत होती. खुप गप्पा झाल्या. मधल्या काळात त्याचे लग्न झाले. त्याने निमंत्रण पाठविले होते, पण त्यावेळी जाणे शक्य झाले नव्हते.

गप्पांच्या ओघात शाळा कशी चालते ते त्याने सांगितले. तो छोट्या मुलांच्या वर्गात शिकवितो कारण त्याचे म्हणणे आहे की, शिक्षकांची खरी कसोटी तिथेच लागते आणि संस्कारक्षम वयातील मुलांवर योग्य संस्कारही करता येतात. बरं, मुलांना तो वर्गात डांबून ठेवत नाही, त्यांना तो मोकळया मैदानात झाडाखाली बसून खेळाच्या माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे मुलं हसत-खेळत शिकतात. छडीचा वापर करावा लागत नाही त्यामुळे गैरहजेरी नसते. त्याला शाळेच्या कामानिमित्ताने जिल्ह्याच्या गावी जावे लागते तेंव्हा गावातील लोकांना लगेच कळते. आज “रस्सी मास्तर” शाळेत नाही, कारण मुलं शांत असतात.

डोंबिवली येथील संघाच्या शाखेत शिकलेले सर्व खेळ तो आता त्याच्या शाळेत शिकवतो. मुलांना ते आवडतात. त्यामुळे सर्व मुलं कायम रस्सी सरांच्या अवतीभवती असतात. सरकारी शाळा, पण दर्जेदार बनविण्याचा प्रयत्न चालू आहे. “मला महाराष्ट्रात जे चांगले संस्कार मिळाले आहेत, ते या मुलांमध्ये संक्रमित करावेत इतकाच माझा हेतू आहे,” असे तो सांगतो.

तेनिंगला शनिवारी दुपारी पोहोचलो, रात्री उशिरापर्यंत गप्पा झाल्या. दुसऱ्या दिवशी पौर्णिमा होती. पौर्णिमेला हाराक्का पंथीथ नागा समाज सकाळी सर्योदयाच्यावेळी पुजा करतो. आम्ही तिथे गेलो होतो. पूजा विधी झाल्यावर त्याने मला दहा मिनिटं सर्वांसमोर बोलायला सांगितले. मी बोलणं संपवून जागेवर येत असतांना रस्सीने मला तिथेच थांबण्यास सांगितले व तो स्वतः पुढे आला.

म्हणाला, “आज पौर्णिमा आहे, हाराक्कांच्या मान्यतेप्रमाणे पवित्र ठिकाणी आपण जमलो आहोत आणि नागालँडमधील मुला-मुलींना उत्तम शिक्षण व संस्कार देण्याचे पवित्र कार्य करणारे महाराष्ट्रातील कार्यकर्ते आज आपल्या सोबत आहेत. ते करत असलेल्या पवित्र कार्यासाठी मी व माझी पत्नी दोघे मिळून छोटा मंगलनिधी देत आहोत. इतकं बोलून रस्सीलुंगने पाकीट माझ्या हाती दिले व वाकून नमस्कारही केला. टचकन डोळ्यात पाणी आले. पेरलेलं कुठेतरी उगवत आहे याची जाणीव झाली आणि भविष्यातील कामासाठी प्रेरणाही मिळाली.

निवासस्थानी आल्यावर त्याने दिलेले पाकीट उघडून पाहिले, तर त्यात चक्क २०,०००/- रुपये होते. क्षणभर विश्वास बसत नव्हता. कारण एका माजी विद्यार्थ्याने देणगी म्हणून रोख रक्कम

देणे हा माझ्यासाठी पहिलाच अनुभव होता. पैशांपेक्षाही त्यातून दिसून येणारी कृतज्ञतेची भावना लाख मोलाची होती. रस्सीलुंग आता खरंच मोठा झाला होता! खूप मोठा! आभाळा एवढा!!

रस्सीलुंग केवळ शाळेत अडकून नाही पडला. तो गावातील तरुणांसाठी धडपडतो आहे. तेनिंग जवळ असलेल्या आसाम रायफल्सच्या कॅम्पमधील आधिकारी त्याच्या संपर्कात आहेत. त्यांच्याकडे दुर्गम भागाच्या सुधारणांसाठी काही योजना असतात त्या तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी तो त्यांना मदत करतो. "महाराष्ट्रात राहून संघ संस्कार मला मिळाले. मी सक्षम झालो. आता माझे कर्तव्य आहे ते संस्कार पुढील पिढीकडे पोहोचविणे." हा विचार घेऊन तो ठामपणे उभा राहिलेला पाहून मलाच त्यातुन उर्जा मिळाली. ●●

---

**पृष्ठ क्र. २ वरुन .... श्री. मधुर पडवळ**

आसामी दोतारा, नगारा (माजुली भागातील वाद्य), खोल (मृदुंग), खांम, डोबा आणि सेरजा (बोडो आदिवासींची वाद्य) वाद्य वाजवू शकतो. अरुणाचल प्रदेशामधील इलू (आपतानी आदिवासींचे हे वाद्य) आणि पोनू योक्सू. नागालँडमधील जेम्जी (मिथुन प्राण्याच्या शिंगापासून बनविलेले वाद्य) आणि ताटी (एकच तार असलेले आसामी आदिवासींचे वाद्य.) तो वाजवू शकतो.

मेघालयमधील कोई-दोतारा वाद्य (खासी आणि जयंतिया हिल्समधील आदिवासींचे वाद्य). मणिपूरमधील पेणा आणि सारिंदा वाद्य. सिक्कीममधील मादल, सारिंदा अथवा सारंगी हे वाद्य नेपाली संस्कृतीशी मिळते-जुळते आहे.

त्याचे व्हिडिओ बघत असताना प्रत्येक वाद्याचे वैशिष्ट्य जाणवत होते. आणि त्याने ते जपले आहे. स्वत:च्या आयुष्यासोबत इतरांचेहि आयुष्य सुंदर करण्याकरिता. अहो, याला साथ देणारे मित्र, मैत्रिणी म्हणजेच ही सुरेल वाद्ये!!

२०१६ मध्ये दिल्ली येथे झालेल्या Songs & Dance of North East या कार्यक्रमात तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या समोर live concert मध्ये त्याने आपली कला सादर केली. आदिवासी संगीत हा एक महासागर आहे. त्याचा प्रसार आणि त्याचे संवर्धन करणे ही एक काळाची गरज आहे. संगीत शिकायचे म्हणजे कधी न संपणारी ही विद्या आहे.

आपल्या भारतामध्ये २९ राज्ये, त्यातील असंख्य आदिवासी जाती आणि त्यातही परत त्यांच्या अनेक उप जाती हीच खूप मोठी गोष्ट आहे. त्याच्याशी बोलताना एक गोष्ट लक्षात आली, की त्याला सर्व काही शिकायचं आहे, पण त्यासाठी हा एक जन्म अपुरा पडेल अशी त्याला भीती वाटते.

याशिवाय तो बंगाली, राजस्थानी - मारवाडी, हिमाचली, आफ्रिकन, युरोपिअन तसेच दक्षिण अमेरिका, मध्य पूर्व अमिराती देशातील काहीशी तर्की पद्धतीची अनेक वाद्ये तो वाजवतो. नुकताच २०१८ साली त्याला शाहीर साबळे पुरस्कार प्रदान करण्यात आला आले.

तर संगीत म्हणजे काय हो..?

संगीत मधून 'त' काढला तर राहतो 'संगी' म्हणजे मित्र, मैत्रिण, 'गी' काढला तर राहतो 'संत' आणि 'सं' काढला तर राहतो 'गीत'... म्हणजेच एक असा मित्र जो संत म्हणजे चांगला असावा, ज्याच्यामुळे जीवनात गीतांची बहार असेल; हेच आहे "संगीत." संगीत काय भन्नाट आहे ना... ते ऐकायलाच हवे. दु:खात ऐकलं की दु:ख कमी होते आणि सुखामध्ये ऐकले की सुख अजून वाढते.●●

पुस्तक

# दुस्वास: नागा कुटुंबातील महिलांवरिल अन्यायाची मन हेलावनू टाकणारी कादंबरी

- डॉ. स्वाती गाडगीळ
९८२०१००५४१

ईस्टरिन किरे ह्या सुप्रसिद्ध लेखिकेची एक अनुवादित कादंबरी वाचण्यात आली. कादंबरीचे नाव दुस्वास. डॉ. कल्पना वांद्रेकर ह्यांनी हा अनुवाद केला आहे. मूळ कांदबरीचे नाव "अ टेरिबल मॅट्रिआर्कि". २०१७ मध्ये नॉर्वेमध्ये वास्तव्य असताना लिहिलेली ही ईस्टरिनची पहिली कादंबरी. ईस्टरिन किरे बद्दल डॉ. कल्पना म्हणतात की, तिची पुस्तकं वाचताना एक वेगळं विश्व साकारायला लागलं. ईशान्येकडील व दुर्गम प्रदेशाची ओळख व्हायला लागली. तेथील माणसं, त्यांच्या प्रथा, भाषा, संस्कृती, जमाती यांची माहिती भाषांतर करुन सगळ्यांसमारे आणायची हा विचार पक्का झाला आणि "दुस्वास" चा जन्म झाला.

नागालँडमधील कौटुंबिक वातावरण आणि मूल्यांचं विविध घटनांच्या आधारे चित्र उभं केलं आहे. त्यात मातृसत्ताक कुटुंब पद्धती पासून तेथील शालेय जीवनापर्यंत आणि शेवटी दारुच्या अतिरिक्त सेवनामुळे होणाऱ्या मृत्युच्या थैमानापर्यंत सगळं कसं लख्ख डोळ्यापुढे उभं राहतं. डॉ. कल्पना वांद्रेकर यांच्या लेखणीला धार तर आहेच पण त्याचबरोबर संवेदनाशीलतेची कड लाभली आहे आणि म्हणूनच प्रत्येकाच्या काळजाला ते भिडल्याशिवाय राहत नाही. नागालँडमधील एका लहान मुलीच्या तोंडून तिच्या घरातील आणि गावाची कथा सांगितली आहे. हा अनुवाद इतका उत्तम जमला आहे, की आपण अनुवादित पुस्तक वाचित आहेत याचा वाचकाला विसर पडतो. वाचताना प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे स्त्रियांनी स्वत:च स्वत:वर लादलेली बंधनं, ओढवून घेतलेला कमीपणा आणि वळण लावायच्या नावाखाली एका स्त्री कडून दुसऱ्या स्त्रीची होणारी अवहेलना. कडाक्याच्या थंडीत सुद्धा दहा वर्षाच्या नातीसाठी आंघोळीला गरम पाणी कशाला? असं म्हणणारी खरंच तिची सख्खी आजी आहे का अशी शंका यावी इतकं ते क्रूर वाटतं. आजी म्हणते, "तिला फाजिल सवयी लावू नको, कशाला हवं आहे गरम पाणी. ती मूलगी आहे!" जेवायला बसल्यावर चिकन वाढताना "लेग पीस" म्हणजे चिकन तंगडी मुलीने मागितल्यावर तिला आजी रागावली. चिकन तंगडीवर फक्त मुलांचा हक्क असतो. उरलेले तुकडे मुलींनी खायचे. असा दुजाभाव सगळ्या गोष्टींमध्ये सतत केला जातो.

मातृसत्ताक कुटुंब असूनसुद्धा मुलींना नेहमी कमी लेखलं जातं आणि मोठ्या कोडकौतुकाने वाढवलेली मुलं मात्र दारुच्या आहारी जाऊन लवकर मृत्यूमुखी पडतात. दारुच्या अतिसेवनाने अन्ननलिकेतील रक्तवाहिन्या फुटून अतिशय रक्तस्त्राव होऊन माणूस दगावतो. यकृत निकामी होते. अशा दोन विदारक घटनांचे वर्णन या कांदबरीत आहे. घरातील लहान मुलांच्या मनावर या सगळ्या गोष्टींचा किती आघात होतो हे सांगायला नको. ते छोटे जीव हे सगळं बघून तळमळतात. तरीही आश्चर्याची बाब ही की दारुबंदीसाठी ठोस उपाय केले जात नाहीत. आज स्त्री-पुरुष समानतेबद्दल आपण इतके जागरुक असताना आपल्या देशातील एका कोपऱ्यात असे चित्र पहायला मिळते हे दुर्दैव आहे.

तशातच एका रात्री तिने आजीला मुलींच्या शापा बद्दल बोलताना ऐकलं. आता हा 'शाप'

कोणता ते कळेपर्यंत तिला चैन पडेना. घरातील मोठ्या ताईला विचारल्यावर तिला कळलं की मुलींना दर महिन्यात पाच ते सहा दिवस रक्तस्त्राव होतो. ते ऐकताच ती भयंकर घाबरली कारण तिने एका शेजारच्या माणसाला दारुमुळे रक्ताच्या उलट्या होऊन मरताना पाहिलं होतं. पाच-सहा दिवस रक्त गेल्यावर मी मरणार तर नाही ना असा प्रश्न साहजिकच तिला पडला. तिने बहिणीला हा रक्तस्त्राव कायमचा बंद करण्यासाठी काही औषध नाही का ? असेही विचारले. तेव्हा तिला तिच्या अवतीभवती शाळेतील मोठ्या मुलींच्या होणाऱ्या गुजबुजीचा उलगडा झाला आणि अशा अवस्थेत शाळेत कसं जायचं ह्याची तिला चिंता वाटू लागली.

मुळातच चुकतं कुठे ते पहा. महिला स्वत:च मासिक पाळीला 'शाप' म्हणतात. अशी जर मानसिकता असेल तर स्वत:चे अस्तित्व पुरुषांइतकेच मोलाचे आहे ही भावना स्त्रियांच्या मनात येत नाही त्यात नवल ते काय! आपणच स्वत:ला कमी लेखायचं, 'शापित' समजायचं आणि आयुष्य कष्टदायक करुन घ्यायचं. मग पुरुषांशी बरोबरी तर राहूच द्या, पण सन्मानपूर्वक आयुष्य जगणं सुद्धा कठीण झाले तर दोष कुणाला द्यायचा? नारी शक्ती, स्त्रियांचे हक्क, त्यासाठीचा लढा व निरनिराळ्या मागण्या, यांना शहरांमध्ये मिडियामार्फत प्रचंड प्रसिद्धी मिळत असताना खेडोपाडी मात्र आपल्याच भगिनी हलाखीचं आयुष्य जगत आहेत, हा केवढा विरोधाभास! घरातील पुरुषांना सुद्धा हा दुजाभाव चालतो. यातून त्यांची ही असंवेदनशीलता दिसून येते. काळ बदलतोय पण आपली मानसिकता कायम आहे आणि बऱ्याच अंशी त्यास स्त्रियाच जबाबदार आहेत हे खरं दु:ख आहे. ●●

## डॉ. कल्पना वांद्रेकर यांच्या 'निद्रिस्त नदी' पुस्तकाची एम्. ए. (अनुवाद) अभ्यासक्रमासाठी निवड

नागा लेखिका ईस्टरिन किरे लिखित - when the river sleeps या पुस्तकाचा अनुवाद 'निद्रिस्त नदी' या नांवाने डॉ. कल्पना वांद्रेकर (पुणे) यांनी केला व ते पुस्तक पुण्याच्या कॉन्टीनेंटल प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. पुणे येथील मॉडर्न कॉलेजने एम्. ए. (अनुवाद) या अभ्यासक्रमासाठी या पुस्तकाची निवड केली आहे. मराठी भाषिक विद्यार्थ्यांना ईशान्य भारतीय प्रदेश, तेथील लोकजीवन व संस्कृती यांचा परिचय व्हावा असा यामागचा उद्देश आहे.

ईशान्य भारतातील नागा प्रदेशाशी संबंधीत साहित्य मराठी भाषेत प्रकाशित व्हावे व या साहित्य सेतू द्वारे एकात्मतेच्या भावनेची जोपासना व्हावी या सकारात्मक दृष्टीकोनातून डॉ. कल्पना वांद्रेकर अनुवादित साहित्याकडे बघतात. ईस्टरिन किरे यांच्याच A Terrible Matriarchy या पुस्तकाचा अनुवादही 'दुस्वास' या नांवाने कॉन्टीनेंटल प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. ईस्टरिन किरे यांच्या आणखी एका पुस्तकाच्या अनुवादाचे काम डॉ. कल्पना वांद्रेकर यांनी पूर्ण केले आहे.

# रा. स्व. संघ, जनकल्याण समिती

## निसर्ग वादळग्रस्तांच्या मदतीसाठी संघ कार्यकर्ते सरसावले

निसर्ग चक्रीवादळाने कोकणातील मंडणगड, दापोली आणि रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यात अभूतपूर्व थैमान घातले. नुकसानीच्या बातम्या सर्वत्र पोहोचल्या असल्या तरी माड, पोकळी, आंबे, फणस, काजू यांच्या बागांचे जे नुकसान झाले आहे ते पैशात न मोजता येणारे आहे. अशाही परिस्थितीत सरकारी मदत पोहोचण्याच्या अगोदरच जर कोणी वादळग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले असेल तर ते म्हणजे संघाचे कार्यकर्ते.

श्रीवर्धन, मुरुड आणि माणगांव या तिन्ही ठिकाणी वादळ थांबल्यावर लगेचच परिस्थितीची भीषणता लक्षात घेऊन कार्यकर्ते एकत्र आले व मदतकार्याची दिशा ठरवली. त्यातून जनकल्याण समितीचे सहाय्यता केंद्र रवींद्र राऊत हायस्कूल श्रीवर्धन येथे तातडीने कार्यान्वित झाले. तहसलिदार, नगर परिषद, गावपंचायती यांच्याशी संपर्क साधून मदतकार्यास प्रारंभ झाला. महत्त्वाचे प्राथमिक कार्य होते ते म्हणजे पडलेल्या झाडांची तोड करुन रस्ते मोकळे करणे. जेणेकरुन घरात अडकून पडलेल्या माणसांना एक-दुसऱ्यांच्या मदतीसाठी घराबाहेर पडता येईल.

कार्यकर्त्यांच्या अनेक टोळ्या कोकणातून तसेच गरजेप्रमाणे मुंबई, ठाणे येथून रवाना होत होत्या. योजनापूर्वक मदत कार्य सुरु होते. दुसरी महत्त्वाची गरज होती, ती घरे उद्ध्वस्त झालेल्या नागरिकांच्या जेवणाची व पुढील दिवसांसाठी शिधा रुपात अन्नधान्य वाटण्याची. विजेचे खांब पडल्याने अंधारात उपयोग व्हावा म्हणून मेणबत्यांचे हजारो बॉक्स व मॅचबॉक्स यांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमणे व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन मोठ्या प्रमाणात पत्रे उपलब्ध करुन त्यांचे आवश्यकतेप्रमाणे सवलतीच्या दरात वाटप करण्यात आले.

अगदी कोल्हापूर भागातूनही मोठ्या प्रमाणात पत्रे पाठवण्यात आले. जनरेटर लावून त्या आधारे विहिरीतून पाणी पुरवठा करण्यात येत होता. विविध संस्थांचे कार्यकर्ते एकदिलाने नियोजनपूर्वक मदत कार्यात उतरले होते. विशेष म्हणजे आपल्या जेवणाची व्यवस्था या कार्यकर्त्यांनी स्वतःच केली होती. स्थानिक नागरिकांवर कोणताही भार पडू नये याची काळजी घेतली जात होती.

सत्कार्यासाठी मदतीचे हात कमी पडत नाहीत याचाही अनुभव येत होता. ज्यांची घरे-बागा सुस्थितित राहिल्या होत्या अशा गावातले गावकरीही मदत कार्यासाठी पुढे सरसावले. हे मदतकार्य सर्वांना सोबत घेवून पार पडत होते; व आवश्यकते प्रमाणे या पुढेही चालू रहाणार आहे असे रायगड जिल्हा प्रचार प्रमूख **डॉ. समीर साळुंके** यांनी सांगितले.

**- प्रतिनिधी**

# उत्साहवर्धक वातावरणात महिला विशेषांकाचे प्रकाशन

**- प्राजक्ता ओक, चिपळूण**

मार्च महिन्यात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, ईशान्य भारतासाठी काम करत असणाऱ्या महिला कार्यकर्त्यां विषयी ईशान्य वार्ता मासिकात थोडक्यात माहिती देऊन त्यांना मानवंदना




देण्याचा प्रयत्न केला होता. ह्या अंकाचे संपादक श्री. रानडे काकांनी माझ्यावर जबाबदारी सोपवली होती. संपादक असणं म्हणजे काय याचा अगदी जवळून अनुभव तर घेता आलाच पण एक अंक प्रकाशित करण्यामागे किती कष्ट असतात हे देखील समजले. अंक जेव्हां वाचकाच्या हातात पडला तेव्हां अनेक वाचकांनी त्याचं कौतुक केलं. प्रतिक्रिया दिल्या व काही सूचना देखील केल्या. अंक अजून उत्तम होण्यासाठी या सूचनांवर नक्कीच विचार केला जाईल.ठाण्यात ईशा टुर्सचे संचालक श्री. आत्माराम परब यांनी महिला कर्मचाऱ्यांचे एक घरगुती स्वरुपात स्नेहसंमेलन आयोजित केले होते.




या महिला विशेषांकात श्रीमती स्मिता रेगे, ईशा टुर्सच्या सहसंचालिका यांच्या पर्यटक ते सहसंचालक ह्या प्रवासावर एक लेख प्रसिद्ध केलेला आहे, ज्याची श्रीमती स्मिता रेगे यांना अजिबात कल्पना नव्हती. या स्नेहसंमेलनात त्यांच्याच हस्ते महिला विशेष अंकाचे अनौपचारिक प्रकाशन करुन त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का देण्यात आला. तसेच शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी ठाणे येथून मणिपूरमध्ये गेलेल्या श्रीमती शिरिष अत्रे यांचा श्री. आत्माराम परब ह्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.




अलिबाग येथे ८ मार्चला **गणराज प्रबोधन मंडळ** आणि **रुरल ॲण्ड यंग फाऊंडेशन** यांच्या संयुक्त विद्यामाने महिला दिनानिमित्त महिला विशेष अंकाचे अनौपचारिक प्रकाशन श्रीमती विद्याताई पाटील (संचालक मयुर बेकरी) यांच्या हस्ते करण्यात आले.●●

Postal Reg. No. **THC / 151 / 2018-2020** Posted at BPC Kalyan on 1st day of every month.
RNI Reg. No. **MAHMAR / 2012 / 45108** Total No. of Pages 32

# चिपळूण नागा मुलींचे वसतिगृह - डॉक्टरांकडून समुपदेशन

**- प्रतिनिधी**

लॉकडाऊन झाल्यावर शाळा बंद झाल्या, वसतिगृहातून बाहेर पडू नये अशा सूचना मुलींना दिल्या. या मुलांच्या ईशान्येतील पालकांचे काळजी व्यक्त करणारे फोन कॉल येऊ लागले. "कोरोना म्हणजे काय?" असे प्रश्नही मुली विचारु लागल्या. त्यांच्या मनातील शंका दूर व्हाव्यात म्हणून डॉक्टरांकडून शंकांचे निरसन व्हायला हवे असे ठरवले. त्यानुसार अपरांत हॉस्पिटलचे डॉ. पालकर, डॉ. श्रीमती कांचन मदार (मेडिकल ऑफिसर गुहागर) ह्यांना बोलविण्यात आले. या सर्व डॉक्टर्स्नी कोरोना विषाणू ह्या साथी संबंधात मुलांच्या प्रश्नांना सोप्या भाषेत उत्तरे दिली.




ह्या आजाराची लक्षणे म्हणजे सततचा खोकला, सर्दी, ताप, श्वसनाला त्रास अशी असल्याचे त्यांनी सांगितले. खोकला, शिंका किंवा थुंकीतून या विषाणूचे कण बाहेर पडतात व सभोवतालच्या १ मीटर परिघात त्याचा परिणाम ८ ते १२ तास तर, लादीवर २४ तास राहू शकतो. त्यामुळेच दोन व्यक्तीत किमान १ मीटरचे अंतर असणे आवश्यक असते. यावर सर्वात परिणामकारक उपाय म्हणजे नागरिकांनी एकत्र न येता आपल्या घरीच रहाणे हा आहे, असे डॉक्टर्स्नी सांगितले.

प्रत्येक कामानंतर हात धुणे, तोंडावर मास्क लावणे, सोशल डिस्टन्स ठेवणे ही काळजी घेतली तर आपण कोरोना साथीला नक्कीच प्रतिबंध करु शकतो असा आत्मविश्वास डॉक्टरांनी आपल्या

हे मासिक मुद्रक, प्रकाशक **श्री. जयवंत कोंडविलकर** यांनी **फ्रेंडस् ऑफ नॉर्थईस्ट सोसायटी**, डोंबिवलीकरिता **अक्षर ग्राफिक्स**, एफ-४, श्री पार्श्व इंडस्ट्रियल इस्टेट, व्ही. पी. रोड, डोंबिवली (पूर्व) येथे छापून ९, जय गायत्री सोसायटी, गोपाळ नगर रस्ता क्र १, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ येथे प्रकाशित केले